जैत रे जैत

कादंबरी

जैत रे जैत

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे

प्रकाशक
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
टिळक रोड, पुणे २

चित्रकार
व्ही एम्. साठे, मुबई ११

प्रथमावृत्ता
अक्षयनृतीया, १८८७

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
सदाशिव, पुणे २

किंमत चार रुपये

प्रिय बाबा

आणि

सौ. इन्दुवहिनी —

चिंधीची चित्ररेखा रेखीत असता

मजपुढे होती

आमची आशू !

भाप्पा

शपथपूर्वक सांगतो, की कर्नाळ्यावरचा दीडशे फूट उंचीचा उभा टेंबा मी पाहिला, आणि थक्कीत होऊन उभा राहिलो. अवघ्या सह्याद्रिमंडळात या जातीचा कडा नाही. मग दिसली त्या कड्याभोवती चहूबाजूंनी लोंबलेली भली प्रचंड पोळी — आग्यामाशांची. त्या पोळ्याचा मध कुणी काढू शकेल, यावर माझा विश्वास बसेना. पण मग बसला. ठाकरवाडीत ठाकरांशी गप्पा मारीत असता त्यांनी जे सांगितले, ते ऐकून आपण तर बुवा तोंडात बोट घातले! अशा अवघड ठिकाणातला मधही ठाकरगडी काढतात! धन्य त्यांची माय त्यांना प्रसवली.

मस्तकात वारे भिरभिरू लागले. गेल्या चारसहा वर्षांत कर्नाळ्यावर चारपाचदा जाऊन आलो. अनेकदा तिथे रात्रीचा मुक्काम केला. खाली तळात वाघरू डुरकत होते. आगटीजवळ मी अन् नाग्या ठाकर शेकत होतो. शेकता शेकता नाग्याला गोष्ट सांगू लागलो. नाग्या असा काही हरखला! ती तर त्याच्या घरचीच गोष्ट होती!

नाग्या ठाकर हा माझ्या गोष्टीचा पहिला श्रोता. बरेच दिवस गोष्ट डोक्यात घुमत होती. मित्रोत्तम अनंतराव कुलकर्णी मजकडून लिहवून न घेते, तर कदाचित् आणखी चारदोन वर्षे कथा तशीच रेंगाळली असती.

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

त्या अंगणाशेजारीच अंधुली करायचा धोंडा मांडलेला. पलीकडे चार दोन झेंडूचे टाळे. मोसमात ते खूप फुलारतात. जणू सोनं उसळत असतं. ठाकर पोरं फुलं तोडतात. कानांच्या भोकांमधून दाण्डे घालतात. मग दिवसभर गाणी म्हणत ढोरांमागं हिंडतात.

चार दोन निरुपाय म्हाताऱ्याकोताऱ्यांपलीकडे दिवसा वाडीत कुणी घावायचं नाही. वाडीजवळच थोडकी भातजमीन आहे. काही भाग्यवन्तांच्या वाऱ्याची. उरलेल्या काहींनी डोंगुराच्या उतारावर तोड करून नागलीसाव्यासाठी रान काढलं आहे.

पिकू लागलेली ठाकरं चोंढ्यांमधून कायबाय करीत असतात. मराईसाठी तयारी चाललेली असते. चोंढे भाजायसाठी पातेरी गोळा करायची. कवळ आणून साठवायचा. रान कुदळीनं फोडून काढायचं. असं सारखं चक्र चाललेलं. सबंद वाडींत बऱ्या ठाकर गावायचा नाही.

जवान पोरं अन् त्यांच्या नवऱ्या रानातून हिंडत असायच्या. उघड्या पायांनी. कमरेला फलाटणीं. त्यांमधून कोयत्या अडकवलेल्या. कधी कड्यांवरून, डोंगर-उतारांवरून खाली लोंबत असलेलं गवत कापतील. अशी अवघड जागा! असं वाटावं, की ही काय माणसं आहेत की वानरं! खुशाल तिथं चढून तिथली गवतं गोळा करतील. गडगडा हसतील. मोटमोठ्यानं हेल काढू काढू बोलतील. गाणी म्हणतील. एकाच्या कंठातून गाणं फुटलं, की डोंगूरभर पसरलेली ठाकर जोडपी त्याची झील धरतील. जणू सगळा डोगूरच गाऊ लागला आहे!

कधी फाटी गोळा करतील. वाळलेली. त्यांच्या मोळ्या बांधतील. गवताचे भारे. मग ती ओझी घेऊन बापये अन् त्यांच्या नवलकरणी पेठेकडे जातील. तिथं तो माल ओपतील. मग वाण्याच्या दुकानात जातील. कोळणीच्या घरी जातील. दुकानातून मीठमिरची अन् तंबाखू घेतील. कोळणीकडून बोंबलाची जुडी. सुकटाचा वाटा. कधी क्वचित हलवायाच्या दुकानातून मूठभर रेवड्या. सांजावलं, की लुगुलुगू घरी परततील. पिती पोरं तर पाठीवरच बांधलेली. त्यांची तशी फारशी चिंता नाही. ओढ आहे नाचाची! रात्री भुत्याच्या अंगणात ढोल घुमघुमू लागेल. मग काही झोपड्यांमधून कळ निघायची नाही. पायात नवतीची थरथर सळसळू लागेल. तेव्हा ढोलावर टिपरू पडायच्या आत परतलं पाहिजे!

सगळ्यांत सुखी आहेत पोरं अन् पोरी. आयश्यांच्या कुशींतून निघाली तशी

बारा चौदा वरीसं उलटून जाईपर्यंत भटकत असतात. क्वचित कुण्या पोरीच्या ढुंगाला लंगुटी. जशा रक्तचंदनाच्या भावल्या. या लहानमोठ्या, केस पिंजारलेल्या भावल्या हाडकुळी कुत्री बरोबर घेऊन रानभर हुंडारत असतात. खेकडे धरीत असतात. त्यांचे पाय काडकाड मोडीत असतात. कवच फोडून कच्चेच गिळीत असतात. कधी पाखरांमागं धावतात. कधी उंदरामागं. असा रानचा मेवा गोळा करीत असतात. कधी पाणलोटातल्या डबक्यातल्या चिंगळ्यांमागं धावत असतात. चिंगळ्या लब्बाड. हातांत आल्याश्या वाटतात. मग सुळ्ककन् सुळकांडी मारून खब्रदाडीत जाऊन लपतात. लहानगी रडूभेकू लागतात. मोठी गदगदा हासतात. इतकी हासतात की गडबडा लोळू लागतात.

कधी ती करवंदीतोरणांमागं जाळ्या पालथ्या हिंडतात. अंग काट्यांनी फाडतात. फाटू दे फाटली तर! ओरखडे उठतात. त्यांतून रक्ताचे थेंब तरतरतात. काळ्या घोगडीवर मधेच एखादा लाल लोकरीचा धागा उमटावा, तसं ते दिसतं. करवंदी अन् तोरणी तर देवाघरचं पाणी पिऊन आलेल्या असतात. त्या विचारतात, किती फळं तोडाल? आम्ही बहरामागं बहर बाहेर फेकू.

ती करवंदं तोरणं संपतच नाहीत. मग पोरं कंटाळतात. ती आंब्यांवर धोंडे फेकू लागतात. एका धोंड्यासरश्या साताठ कैऱ्या खाली टपटपतात. मग त्या अर्ध्यांमुर्ध्या चावीत पोरं कंदांमुळांमागं हिंडतात.

संध्याकाळ झाली की पळसाच्या द्रोणांमधून दिवसभरची लूट घेऊन पोरं वाडीकडे परतू लागतात.

अशी अवघी वाडी दिवसभर उन्हातान्हात रान पालथं घालते. पण भगताला मात्र यातलं फार कमी करावं लागतं. थोरला भगत हरफंदी आहे. घरी पटाशीकिकरं आहे. वाकसही आहे. थोरला भगत एखादी काथवट कोरीत बसतो. एखादी लाकडी पळी, लाकडी बैल, असं कायबाय त्याचं चालू असतं. भगतगिरीवर पोटापुरतं मिळतं. भरीला नाग्याच्या आयशीचं फाटीमोळ्या विकणं.

नाग्या मात्र पोरांबरोबर हुंडारत नाही. तो बकरी चारुन आला, की बाला पुसतो,

"बा—"

"काय म्हन्तो?"

"ढोल कहाडूं का?"

"कहाड !"

मग भाग्या माचावरून ढोल खाली काढतो. लहानसा नाग्या ढोलापुढं बसतो. त्याचे हात धडपणं दोन्ही पुडांशी पोचतही नाहीत. पण त्याची बोटं अन् डाव्या हातीचं कांडकं ढोलावर चालू लागतं. नाग्या आयशीच्या पोटात होता, तेव्हा-पासून याचं वाजिवणं ऐकतो आहे. तो रांगत्याचा चालता झाला, तेव्हा थाळी बडवू लागला. मग एक्या दिशी बाच्या माडीवर बसू बसू त्यानं ढोलावर बोटं टाकली. बा चमित्कारला. तो ऐकत राहिला.

पोराच्या बोटांमध्ये गंमत आहे. देवानं दिलेली. बोटं ढोलावर पडताच ढोल गमतीचं बोलू लागतो. जे वाजवणं येता येता बाच्या डुईची पांढर व्हावी लागली, ते या कार्ट्याला सहज जमलं आहे!

मग बा नाग्याच्या ढोलापुढं बसतो. तो त्याला काही परण शिकवतो. काही हिकमती दावतो. त्या अगदी दावल्या तशा नाग्याच्या हातून उमटतात. किंबहुना त्याहून सरस!

पोरं रानभर हुंडारत राहतात, त्या वेळी लहानग्या नाग्या नाक ओढीत ढोलाशी प्रीत जमवीत असतो. कधी तर त्याचं वाजवणं ऐकून ठाकरगडी हाती गावत असलेलं पाखरू तसंच सोडून थक्कीत होतात. विचारतात,

"कोन र ढोल वाजिवतो?"

"दुसरा कोन? भगत!"

ज्याला माहीत असतं तो सांगतो,

"नही र नही! नाग्या!"

"उलीसा?"

"हा हा!"

"बायलीला! चमित्कारच हये!"

करंगळी उभारून लिंगोबाचा डोंगर कधीकाळीचा वाडीच्या पाठीशी उभा आहे. करंगळीभवती इतिहासकाळी गडेकोट रचलेला होता. कुणी ते माहीत नाही. मराठेशाहीत कधी कचित त्या गडेकोटात भवतालच्या राहाळाच्या देख-

रेखीसाठी पाहारा असे. पण लिंगोबा हा सह्याद्रीच्या माळात बराच आत दडलेला. भवताली नामांकितपैकी खोरंही नाही. त्यामुळं पाहारा • जागता राखण्यापलीकडे या गढेकोटानं फारसं नामजद काम केलं नाही. मराठेशाही निमाल्यावर गढेकोट पार ढासळला. इथं तिथं उभ्या असलेल्या एखाद्या पडक्या बुरुजापलीकडे आता गढेकोटाचं कसलंही चिन्ह उरलेलं नाही. भवतालचं रान राखीव जंगल आहे. करंगळीच्या, म्हणजे अदमासे दीडशे फूट उंचीच्या सरळ-सोट बुधल्याच्या पोटाशी मावळतीकडे बुद्धकालीन लेणं आहे. स्तूप नाही, नुसत्या खोल्याच काढलेल्या आहेत. शेजारी खडकात खोदलेली पाण्याची टाकी आहेत. उन्हाळ्यात जेव्हा सगळ्या राहाळात पाण्याचा खडखडाट होतो, तेव्हा टाक्यांतून थंडगार पाणी भरलेलं असतं. अगदी दातात शिळक भरेल, इतकं गार. कधी क्वचित त्याच्यावर हिरवी साय येते. पण तेवढी बाजूला सारली, की खाली आरशासारखं गंगाजळनिर्मळ पाणी. जंगलात फेरफटका करणारे फॉरेस्ट-गार्ड, कंदमुळं काढणारे ठाकर, मोळ्यांसाठी फाटी गोळा करणाऱ्या ठाकरणी, अन् अगदीच कधी क्वचित वाघरामागं हिंडणारे शिकारी, ही सगळी रानभटकी माणसं हे पाणी पितात. धापतात. मनं उमलून त्यांच्या मुखांतून टाकं खणणाऱ्या-साठी आशीर्वादाच्या माळा बाहेर पडतात.

पण लिंगोबाचा डोंगर ठाकरवाडीत प्रसिद्ध आहे, तो या पाण्यासाठी नव्हे. त्यावर उगवणाऱ्या वनस्पतींसाठीही नव्हे. बुधल्याच्या पोटाशी असणाऱ्या लेण्यांसाठीही नव्हे.

नाग्या उलीसा होता, तेव्हा बाबरोबर डोंगुरावर आला होता. त्याच्या खांद्यावर बसून. ढोलाचं खोड कोरण्यासाठी बा हिरडीचं झाड शोधीत होता. चांगला जुनार आडवा बुंधा पाहून रात्री पाच दहा ठाकर गडी आणून तो तासा दोन तासांत झाड तोडणार होता. लगेच बुंधा अलग करणार होता. ठाकरांच्या खांद्यावर देऊन पळवणार होता. मग ते लाकूड पाण्यात भिजविण्यासाठी ओढ्याच्या डोहात ठेवून देणार होता. वर्षभर बुंधा पकला, की मग आपापले उद्योग टाकून ठाकरगडी तो कातायच्या चाकावर घालणार होते. स्वतः

नाग्याचा बा किकरं घेऊन बुंध्यातून ढोलाचं खोड कातून काढणार होता. ही ठाकरांची परंपरा होती. कानाऱ्याकडून कातवून घेतलेलं खोड ठाकरांना चालत नव्हतं.

बा हिरडीचं झाड शोधायला बाहेर पडला, अन् कोंबड्यांमागं धावत असलेला नाग्या हातातली काटकी टाकून म्हणाला,

"मी येतू!"

"आर तुझ्या कोंबड्या डालायच्या न्हायल्या!"

"मी येतू! लिंगूबाला!"

"येतो? चाल!"

बानं नाग्याचे खवाटे धरून त्याला गरगरा फिरवलं अन् मग खांद्यावर बसवलं. त्यानं एकदा कमरेच्या फलाटण्याला कोयती आहे की नाही, ते चापसून पाहिलं, अन् मग तो जाळ्यांमधून अन् झाडांमधून लिंगोबाच्या डोंगुराकडे चालू लागला. वाटेत आडव्या येणाऱ्या काट्याकुट्या तो हातानं तोडी. कोयतीचा उपयोग करावा लागे तेव्हा तो नाग्याला सांगे,

"टकुरं नीट धर बरं का!"

"हा!"

"नही तर पडशील!"

"नही!"

नाग्याला फार बरं वाटत होतं. अगदी त्याला उमजायला लागलं, तेव्हापासून लिंगोबाचं बोट त्याला खुणावीत होतं. बोलावीत होतं. हाती धूळ घेतलेल्या नागव्या धप्प नाग्याची नजर एकदम लिंगोबाकडे जाई. मुठीतली धूळ तशीच गळून पडे. त्याला मोठं नवल वाटे. बाकी एवढे टोपलीभर डोंगूर आहेत, त्यांतल्या कुणीच कसं बोट उचललं नाही? या डोंगुरानंच कसं उचललं? बोट उचलून डोंगूर काय दाखवतोय? काहीतर दिसत नाही आभाळात! असा कसा हा देव?

त्याला फारदा वाटलं, की डोंगुरावर जावं, बुधला जवळून पाहावा. त्याला कव घालावी. आवळावं. आता आपले हात तर लहान आहेत. असेनात का! कमीत कमी त्याच्या सावलीत उभं राहावं. त्याला अगदी खेटून. मग आरडून पोरांना सांगावं, आता पाहा माझ्याकडे!

ते आज बानं जुळवून आणलं. त्याला म्हणताबरोबर तो चल म्हणाला.. खांदल्यावर बसवून घेऊन चालला आहे.

लिंगोबाची चढण चढू लागल्यावर बरेच दिवसांची शंका नाग्यानं विचारून टाकली.

"बा, डोंगुरानं बोट कशापाई उचेललं ?"

"कंचं ?"

"ह्ये ?"

बा हासला. छातीपर्यंत पोचलेल्या नाग्याच्या पोटऱ्या दाबीत तो म्हणाला,

"महाद्येव हाय त्यो. मांडी घालून बसला हाये."

"कुटं ?"

"त्यो काय ?"

"दिसत त नही–"

"पुन्येवंताला रातींचा दिसतो. त्याचा ढवळा बईल हाये. लई ऊंच. त्येच्यावर महाद्येव पुनवेच्या रातीं बसतो. रातभर हिंडतो. कोंबडा आरवला, कीं पुनः दगूड होतो. पुनः एक्या जागीं निसूर !"

"त्वां पवितला ?"

"ऊं हूं ! पर सांगूं नगस कुनाला."

"कां ?"

"समद्यांना ठावकं झालं, त द्येव हिंडायाचा बंद हुईल."

चमत्कारिकच आहे हा देव ! सगळ्यांना ठावकी झालं, तर काय बिघडलं ? गळ्यांतली घाटरं वाजवीत पांढरा बैल रानभर धावडवावा. ठाकुरवाडीत यावं. विडीबिडी ओढावी. पाणी प्यावं. चार इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलाव्या. रात्री ठाकर नाचिये नाचायला लागले की बा ढोल वाजवतो. तं ऐकावं. येत असेल, तर एखादं गाणंबिणं म्हणावं, चार नाचाची पावलं टाकावीत —

पण नाही, देवाचंही बरोबरच आहे. ठाकरांचं नाचणं अवघड असतं. ल्हानपणापासून नीट निरातीनं न्याहाळावं, न पेंगता अवघं बघावं, कसब ध्यानी घ्यावं, तेव्हा कुठं नाचामधे शिरता येतं. तरी जाणत्या गड्यासारखं नाचता येत नाहीच. त्यासाठी खूप पावसाळे जावे लागतात. देव झाला म्हणून काय झालं ? त्यालाही ठाकरांमध्ये मिसळून नाचता यायचं नाही एकदम. कंटाळला, तर पेंग

येईल. झोप लागेल. तंवर कोंबडा आरवेल. त्याच्या बांगेबरोबर देवानं दगूड व्हायचं असतं. आता देवाचा हा दगड भलत्या ठिकाणीं झाला तर केवढी आफत ? मग खेळायचं कुठं ? लंगडी कुठं घालायची ? कोंबडयांच्या मागं कुठं धावायचं ? तर देव करतो ते बरोबरच करतो. देवच तो ! चुकेल कसा !

वाटेतल्या जाळ्यांमधून मुरुडशेंगांचे वेल होते. बानं चालता चालता हाती लागल्या त्या शेंगा तोडल्या. लंगुटीच्या टोकाला बांधल्या. बचकभर शेंगा वाण्याला दिल्या, तर तो मूटभर शेंगदाणे अन गुळाचा खडा देतो. आयशी मोळी घेऊन जाते, तंव्हा ओट्यात मुरुडशेंगाही नेते. ती परतते, तेव्हा नाग्या तिच्या अंगाशी झोंबून दाणे अन् गूळ घेतो. नाग्याला दाणे आवडतात.

बा डोंगूर चढत होता. त्याचं डोकं हातांच्या कवेत नीट धरून नाग्या आश्चर्यानं बुधला निरखीत होता. मधूनच त्याला वाटत होतं, की बाचं डोकं चांगलं छान धरून ठेवलं पाहिजे. कुठं ते पडलंबिडलं तर ? बा बुधल्याच्या पोटाशी पोचला. लेण्यापाशी त्यानं नाग्याला खाली उतरवलं. पळसाचं पान खुडून त्याचा द्रोण केला. मग टाक्यातलं पाणी द्रोणात काढून नाग्याला प्यायला दिलं.

लेणं पाहूनच नाग्या अचंब्यात अगदी बुडाला. हे काय आहे ? कशासाठी केलं हे ? त्यानं बाला पुसलं, " बा ह्ये ? "

" त्ये पांडावांनीं क्येलं ! "

" पाण्डाव ? "

पाण्डव म्हणजे काय ते बालाही नीटसं माहीत नव्हतं. त्याला नाचातलं एक गाणं पाठ होतं—

आर्जुनाचा बान–बान निंगाला गंगनीं
बान निंगाला गंगनीं–तव्हा हालली धरनी

ते त्यानं नाग्याला म्हणून दाखवलं. बोलला,

" आर्जून पांडावाचा भाऊ. "

ज्याचा बाण आकाशात गेल्यावर धरणी थरथरा कापली, त्याला ही खोली खोदणं काही अशक्य नसावं. पण बानं याच्यापुढं काही सांगितलं नाही, अन् म्हणाला,

" पानी प्ये ! "

बाय् रे ! कसं थंड पाणी आहे ! आज काय काय चमित्कार दिसणार ते देवचाराला ठाऊक ! घोटभर पाणी तोंडात घेऊन नाग्या अगदी चकित झाला. नुसता बाकडे पाहात राहिला. त्याला काही बोलावं तर सुचेना. बा डोळे मिचकावून म्हणाला,

" मजा ? "

मिटक्या मारीत नाग्यानं म्हटलं,

" मजा ! "

" ग्येवाचं पानी ! "

पुनः बानं त्याला खांदल्यावर बसवलं, अन् मग तो आडव्या वाटेनं बुधल्याच्या पोटाखालून पुढं निघाला. नाग्यानं विचारलं,

" घरीं न्हाई जायाचं ? "

" आनी मजा दावतों—"

बुधल्याला वळसा घालून बा पलीकडे पोचला. नाग्या आश्चर्यानं एक एक निरखीत राहिला. मान वळवून वळवून. शेवटी ती दुखायलासुद्धा लागली. तडा-तडा चालत बा बुधल्यासमोरच्या सोंडेवर पोचला, अन एकदम वळून म्हणाला,

" आतां पघ ! "

ओ हो ! ठाकरवाडीकडे देवाची पाठ आहे तर ! तोंड हे इकडे आहे. हपापलेला नाग्या बघू लागला. बाला पुसू लागला,

" ग्येवाच्या डुईवर झाड हाये—"

" ग्येवाची शेंडी. "

" आपली मागं आसती ? "

" त्यो ग्येव. त्याची फुडं ! "

एकदम नाग्या ओरडला,

" बाबौ ! आग्या म्होळं ! "

" व्हय् ! ग्येवाच्या गळ्यांत म्होळांची माळ ! "

किती किती आहेत ही मोहोळं. मोजता सुद्धा येत नाहीत. पाच सात दहा—छे ! पुढं काय ते नाग्याला ठावकीच नाहीं. टकटका बघत राहिलेल्या नाग्याला बानं सांगितलं,

" तीं मधलीं पोलीं दिसलीं ? "

" लई मोठीं ? "

" त्यांत सोन्यारुप्याची रानी माशी ! "

" बाबौ ! "

" ती या राहाळांतल्या समद्या माश्याची देवी. तिची अवघ्या राहाळावर छाप चालती. समद्या माश्या तिची परजा ! कुनीबी तिच्या भाएर जायाची नही. "

" माश्यांची बी देवी आसनी ? "

" देव समद्यांचं आसत्यात. झाडाचा देव ? "

" व्हय—चिंध्या असत्यात त्येच्यावर—"

" दगुडाचा देव ? "

" हा हा—"

" रानाचा देव ? "

" हा हा—"

" तसं समद्यांचं. माशीची बी देवी. "

आता नाग्यानं कुतूहल शमवून घेतलं,

" वाहागाचा देव ? "

" वाघोबा देव —"

" बरुबर. सापाचा ? "

" नागदेव—"

पण मग नाग्याचं लक्ष महादेवाच्या रूपानं वेधून घेतलं.

बुधल्याच्या या भागावर ओबडधोबड का होईना, पण नाकाडोळ्यांची कल्पना करता येत होती. वरती भली प्रचंड कपाळपट्टी, अन् तिच्यावरती पुढल्या अंगाला किंचित एका बाजूस एक टेंगणंटुसकं झाड. ती महादेवाची शेंडी !

कपाळाखाली मधोमध नाकाडाचा उंच भाग खाली उतरला होता. त्याच्या दो बाजूंस खोलवणांमधे महादेवाचे मिटलेले डोळे ! त्या खोलवणांच्या वर खबदाडांमधून गवत उगवलं होतं. त्या महादेवाच्या भुंवया. नाकाखाली पुन्हा आडवी गवताळ खबदाडं होती. आडवी पसरलेली. त्या महादेवाच्या मिशा.

महादेवाचे ओठ अन् हनुवटी गायब होती. मात्र कड्याच्या अर्ध्याअधिक

उंचीवर मिशांखालून खोलगट भाग दो बाजूंस वरपर्यंत चढत गेला होता. तो महादेवाचा गळा. या अर्धचंद्राकार पट्टीतच वरपासून खालपर्यंत आग्या मध-माश्यांची प्रचंड पोळी लटकलेली होती. तो महादेवाच्या गळ्यातला हार !

या बुधल्यावर कुणीही कधीच चढून जायचं नव्हतं. एक तर तो दीडेकशे फूट उंचीचा बेलाग कडा. चहू अंगांनी तुटलेला. अन् मुख्य भाग असा, की तो महादेव ! त्याच्या डुईवर कोण चढून जाणार ! मराठेशाहीत तर कुणी मुसल्मान सरदारसुद्धा कधीं लिंगोबाच्या बुधल्यावर चढला नाही. खरंच असला देव, अन् बसला छाताडावर, तर घ्या काय !

बा एकेक आचीर सांगत गेला. महादेवाच्या गळ्यात मधोमध जी भली प्रचंड पोळी आहेत दोनतीन, त्यात कुठंतरी ती सोन्यारुप्याची देवमाशी राहाते.

ती अशी थोरली असोल्या नारळाएवढी. कधी कवचित रात्रींची ती बाहेर पडते. रानभर पसरलेल्या आपल्या परजेच्या पोळ्यांना भेट देते. खंडणी घेते. खाणंपिणं होतं. चिलीमतंबाखू. मग ती रमतगमत, पहाट होण्याच्या आत आपल्या ठिकाण्यावर परत फिरते.

या देवीमाशीचंही दर्शन पुण्यवंतालाच घडतं. आता महादेवाच्या दर्शनासाठी जितक्या पुण्याची गरज आहे, तितकं काही देवीमाशीसाठी नको. आपलं साधं पुण्यही पुरतं. पण पुण्य पाहिजे. भलत्याला ती दिमत नाही.

तिचा असा मोठा झळाळ. आगीचा पुंज असावा तसा. अंधाऱ्या रात्री देखील त्या उजेडात लख्ख दिसतं म्हणे. म्हणजे नाग्याच्या बानं सुद्धा ती पाहिली नव्हती. तो भगत, तेव्हा कदाचित ती त्याला दिसली असती. पण एकदा तो चक्क खोटं बोलला होता. साधंसुधंही नव्हे. चांगलं पक्कं. पोटचं पाडण्यावरून झालेल्या एका मारामारीच्या खटल्यात त्यानं खोटी साक्ष दिली होती. तेव्हा-पासून त्याला देवचारांचं येणंजाणं दिसायचं बंद झालं होतं.

बा बोलत होता. नाग्या ऐकत होता. डोळ्यांची उघडमीट करीत होता. त्या दिवशी बानं खूपखूप सांगितलं. भवतालच्या डोंगुरांच्या कथा ऐकवल्या. त्यांतला कुठला एक डोंगर हज्जार वर्षांपूर्वी सरडा होता. कुठला एक अजगर होता. कुठला एक तरस होता. ते रात्रीचे शिकार साधायला निघत. तिथ्यावर हात मारीत. धावत. पहाटेस कोंबडा आरवण्यापूर्वी धावत धावत आपापल्या जागी येऊन बसत. पुनः डोंगूर होत.

पण मग कली सुरू झाला. कुठंतरी पथपाणी चुकलं. तरसानं कोंबडी कुत्री मारायचं सोडून कुण्या गाउलीवर तोंड चालवलंन. मग महादेव रागावला. त्यानं अवघ्या डोंगुरांचं रूप पालटणं बंद करून टाकलं. तेव्हापासून बिचारे डोंगूर मुकाट्यानं आपापल्या जागी बसले आहेत.

लिंगोबाच्या सावलीत एका धोंड्यावर बसून बा असं सांगत होता. काय काय नि काय काय. नाग्याच्या पोहोचेपलीकडलं. नागवा नाग्या उकिडवा बसून, हात हनुवटीखाली देऊन ऐकत होता. थक्क थक्क होत होता. त्या दिवशीचा सुर्व्यादेव मावळला, अन् त्या एका दिसात नाग्या काल होता त्यापेक्षा खूपच जाणकार झाला.

आयशी फाट्यांची मोळी उचलून बडबडत इतर ठाकरणींबरोबर पेठेला निघून गेली. बाजार करण्यासाठी. बा अंगणात बसून कुऱ्हाडीचा दांडा ताशीत होता. खूप खूप दिवसांपासून विचारायचं राहून जात होतं. आज विचारून टाकावं.

नाग्या पाखरं धरायचं तिकाटणं बांधीत होता. आंब्याच्या झाडांवरल्या बांडगुळाची इवली इवली तांबूस फळं त्यानं गोळा करून आणली होती. त्यांचा चीक तिकाटण्यावर लावायचा. पाखरू त्यावर बसलं, की आडकून पडतं. बाला एकट्याला पाहिलं, तसा तिकाटणं हाती घेऊन नाग्या बाजवळ पोचला.

"काय करीतो र बा?"

"काय नाय बा! कुऱ्हाडीचा दाण्डा!"

हे तर नाग्यालाही दिसत होतं. पण उगीच कांहीतरी विचारायचं म्हणून त्यानं विचारलं होतं झालं. कोयतीचे चारदोन घाव घातल्यावर बानं दाण्डा चहू अंगांनी निरखला. मग एकदा उजव्या तळहातावर थुंकून त्यानं पुनः कोयती हाती घेतली, अन् नाजूक काम सुरू केलं. दांड्याला आकार आला होता, आता तो केवळ घोळायचा तेवढा राहिला होता. बा दाण्डा तासू लागला. पातळ छिलपाटं निघू लागली. त्यांतलं एक छिलपाट बाच्या वाढलेल्या दाढीत अडकलं. नाग्याला हसू आलं.

हात न थांबवता बानं पुसलं,

"का र हासतो ?"

"तुज्या दाढींत छिलपाट–"

बाही नाग्याच्या हसण्यात सामील झाला. दोन्ही हात कमरेवर ठेवून नाग्यानं विचारलं,

"बा, येक सांगतू का ?"

"तुजं तिकाटनं झालं ?"

"नही, पर सांगतू का ?"

"काय ?"

"तू पुन्येवन्त हुता तवा काय काय करीत हुता ?"

आता मात्र बानं दाण्डा छिलणं थांबवलं. हे पोरगं असे भलतेभलते प्रश्न का विचारतंय् ? बा एकटकीनं नाग्याकडे पाहू लागला. आग्रह करून नाग्यानं पुसलं,

"सांग ना !"

"मी पुन्येवन्त हुतो ? कवा ?"

"मागं नव्हता का ? आन् मंग त्वां खोटं सांगितलं ? मंग तुला रानीदेवी दिसना झाली ?"

अच्छा ! ते माहीत व्हायला हवं आहे याला एकूण ! मग बानं कोयती एका अंगाला ठेवून दिली. दाढेच्या बाजूला तंबाखूचा चोथा होता. तो थुंकून टाकला. मग क्षणभर डोळे मिटले, अन सांगू लागला—

"पुन्येवन्त व्हायचे लई नेम असत्यात."

"सांग कीं !"

"भगताला लई साधना करावी लागती."

"मीबी करीन साधना."

"अजून जरा जान्ता हो की !"

"आतांच सांग–"

"जलमभर पाळना करावी लागल्."

"करीन."

"पडवळ खायाचं नही.".

"पडवळ खायाचं नही–कशापाई ?"

" मंग भुत घालवायचा मंतर काम करीत नही. '

" मला सांगशील ? "

इकडे तिकडे करून बानं म्हटलं,

" आईक तर खरी ! "

" सांग. "

" दूर बसल्याली समोर आली, तर जेवायचं नही—"

" जेवायचं नही– "

नाग्या बोलून गेला. पण मग तो गोंधळला. त्यानं हातानं बाला थांबवीत विचारलं,

" दूर बसल्याली ? म्हंजी ? "

हसल्यासारखं करून बा म्हणाला,

" तुपल्या आयशीला इच्यार. "

" इच्यारीन. म्होरं ? "

" आमुश्याच्या दिवशीं द्येव मावळल्यावर जेवायचं नही—"

" जेवायचं नही. म्होरं ?

" रोज आंघुळपांघुळ करायची. पाक न्हायाचं. पराया बाईबापडीकडे पघायचं नही. खोटं कंदीं बोलायचं नही. झाडाचं हिरवं फळ तोडायचं नही. हिरव्या झाडावर कुऱ्हाड कोयती चालवायची नही. घुघू अन् कावळा खायचा नही. अशी लई साधना हाये—"

बा जे जे सांगत गेला, ते ते नाग्या पुनः उच्चारीत गेला. उगीच आपलं ध्यानात पक्कं राहावं, यासाठी. असं सगळं संपल्यावर नाग्यानं विचारलं,

" ह्ये समदं पाळल्यावर मी पुन्येवन्त हुईन का ? "

" हुशील त का झालं ! "

" मंग रानीमाशी मला दिसल का ? "

संशय प्रगट करून बा म्हणाला,

" दिसल बी, नही बी—"

" आनी ढवळ्या बईलावर बसलेला म्हाद्येव ! "

बानं रोखून नाग्याकडे पाहिलं. मग तो उठून नाग्यासमोर आला. त्याचे दोन्ही दण्ड धरून तो म्हणाला,

" पोरा माज्या, आईक ! "
" काय ? "
" त्या नादीं लागूं नगस ! "
" का र ? "
गंभीर शब्दांत बानं सांगितलं,
" त्यो बईल दिसला, कीं मानूस त्याच्या मांगं जातो. रातभर हिंडत ऱ्हातो. कोंबड्यानं बांग दिली, कीं म्हादेव दगूड होऊन बसतो. बईल गुपीत होतो, आन् —"
" काय हुतं ? "
" मानसाचा धोंडा हुतो ! "

मावळतीकडून काळे ढग भरभरून यायचे कमी झाले. भाताची खाचरं जोगावली. त्यांच्या बांधांवरून शेदवलेलं हिरवट शेवाळं दिसू लागलं. तरोट्याची फुलं गळून शेंगा जुनार झाल्या. कुड्रीच्या तुऱ्यांमधून बी धरलं. बिळांतले खेकडे मरून गेले. त्यांच्या कवच्या जागोजाग आढळू लागल्या. आश्विन महिना उलटून जायला आला.

सगळ्या ठाकरवाडीत दिवसातून तीनतीनदा भाताची भगुणी शिजू लागली. धान पुरतं वाळायची वाट पाहतो कोण ? आरध कच्चीच लोंबटं काढून आणायची. कुटायची. सुपात घालून भात पाखडायचं. कांडायचं. शिजवायचं. मग ते मऊ लूस अन्न दिवसातून तीनतीनदा खायचं. खच्चून.

खांद्यावरून घोंगड्या लोंब्त्या सोडायच्या. कानांच्या पाळ्यांवर फुलांचे तुरे खोवायचे. कुत्री बरोबर घेऊन रानभर हिंडायचं. एखादा ससा गावला, तर सोलून भाजायचा. भाताबरोबर मटकावायाचा.

अंगावर कपडा आहे, आहे. नाही, नाही ! या सुगीच्या दिवसांत ती किरकोळ चिंता करतो कोण ? रात्री ढोलाचा थरारा घुमणार आहे. पायांभवती चाळ गुंडाळले जाणार आहेत. घुंगरांच्या छुमछुमीनं सगळी दरी भरणार आहे. गाण्यांचे पडसाद लिंगोबाच्या डोंगुरावरून धडकून परत फिरणार आहेत.

१६ : जैत रे जैत

आश्विनी अमावास्या अशी रात्रभर नाचून साजरी झाली. मोहाच्या फुलांची दारू पिऊन ठाकर खूप नाचले. सगळं अंगण रात्रभरच्या धुमाळीत कडक झालं. त्यावर चोप द्यायची गरज काही उरली नाही.

मधूनच बा नाग्यासमोर मांडी घालायचा. डोळे मिटून त्याचं वाजवणं ऐकायचा. त्याच्या हातून काही खुबीदार वाजवणं उमटलं, की बाचं अंग शहरायचं. तो गदगदा सगळं शरीर तिथल्या तिथं हलवायचा.

तांबडं फुटलं. ठाकरगड्यांनी चाळ सोडले. ठाकरणी कधीच्याच उठून गेल्या होत्या. त्यांनी घरोघरी भाताची भगुणी चुलींवरून चढविली होती. त्यांमधून निघणारे वास चहूकडे दरवळत होते. कुठं नागलीच्या भाकरी तव्यांवर धबधबा वाजत होत्या. भाजक्या बोंबलांच्या गंधानं ठाकरांची तोंडं पाणावली, अन् भुका चाळवल्या.

नाग्याच्या खांद्यावर हात ठेवून बा घरी आला. आयशी म्हणाली,

" किनी उशीर ? केंधळचा भात शिजून पडला ! "

नाग्या काही उत्तर देणार, तो बानं त्याच्या तोंडावर हात ठेवला. म्हणाला,

" नाग्या, आज इतक्या आवशीं ज्यावायचा नहीं. "

आश्चर्यानं नाग्या बोलला,

" मंग ? "

" आंघुळी पांघुळी करून या. "

आयशीनं मधे तोंड घातलं,

" भात गारढोण झाला – "

बानं तिच्याकडे वळून म्हटलं,

" काल कंचा दिवस ? "

आठवून आयशी म्हणाली,

" आमोशा. "

" कुंच्या म्हइन्याची ? "

" अगा बाये ! पर आजच घाई कशापाई ? "

" पोर जानता झाला. आतां समदं त्याला याया पायजे. "

हे ऐकताक्षणी नाग्याचं अंग मोहोरलं. आज तो बाकडून मंत्र घेणार. भगत होणार. आता त्यानं नियम पाळले पाहिजेत. पुण्यवन्त झालं पाहिजे. म्हणजे

मग दिसला तर रात्री पांढऱ्या बैलावरून हिंडणारा महादेव—

ते दोघे ओढ्यावरून आंघुळी उरकून परतले. तंवर आयशीनं झोपडी स्वच्छ सारवली. गाईच्या शेणानं. झेंडूचे चार टाळे तोडून आणून ते दारासमोर कुडात खोचून ठेवले. गाडग्यातून ऊद शोधून ठेवला. मूठ दोन मुठी तांदूळ आली-मीनच्या ताटलीत ओतले. शेंदराची पुडी आढ्याशी खोचून ठेवली होती, ती खाली काढली. एक नारळही.

चुलीजवळच्या ओट्यावर एका आलवणाच्या तुकड्यावर चार दोन टाक होते. एक कान्होबाचा. एक चेड्याचा. एक वीराचा. त्यांच्याजवळ शेंदरानं माखलेला एक गोल धोडा होता. त्यावर जुनाट खण झाकला होता, अन् चार लहान लहान हिरव्या बांगड्या खणावर ठेवल्या होत्या. तो धोंडा म्हणजे भवानी देवी. शेजारी मातीची कानतुटकी धूपदाणी ठेवलेली. आयशीनं गोवरीचं खांड चांगलं तांबडं धगधगीत पेटवलं, अन् ते धूपदाणीत ठेवलं.

इतक्या पहाटेस नाग्या अन् त्याचा बा असे दोघे आंघुळी उरकून ओल्या लंगुट्यांनिशी परतले, हे खोकून खोकून जीव जात असलेल्या सुंभा पाचाग्यानं पाहिलं. त्याचा खोकला म्हणजे ठाकरवाडीची जागलच होती. रात्रभर तो उकिडवा बसून खोकत असायचा. छाती अगदी पिंजून पिंजून निघाली होती. फासळीन फासळी दिसू लागली होती. बाईल कंटाळून रोज म्हणत होती,

" मेला मरत का नही ? थुकून थुकून चुलखण्डाशी बरबटून ठिवलं समदं—"

पण सुंभा मरत नव्हता. तो झोपडीच्या दाराशी बसून एकीकडे खोकत होता. दुसरीकडे वाडीभर ध्यान ठेवीत होता. त्यान हात पालवून लंगुट्याला बोलावलं. मग कसाबसा दम टाकीत तो म्हणाला,

" नवा भगत - "

डोळे फाडीत लंगुट्या म्हणाला,

" भगत ? "

चहूबाजूंनी शिरा लोंबत असलेला लाकडासारखा आपला हात सुंभानं नाग्या अन् त्याच्या बाकडे वळवला. लंगुट्याच्या डोक्यात फक्कन उजाडलं. तो तुरु-तुरु नाग्याच्या झोपडीत जाऊन पोचला. तो धावत असलेला पाहून तुकते जेवल्यावर खुळखुळा चुळा भरून त्या गिळीत असलेले आणखी चार दोन ठाकर गडी झोपडीत जमले.

१८ : जैत रे जैत

नाग्याचा बा आज गंभीर होता. झोपडीत पोचताक्षणी त्यानं आढ्यात खोचून ठेवलेला मोरपिसांचा कुंचा खाली काढला. तो हाती घेऊन बा तांबड्या आलवणावरच्या टाकांसमोर पोचला. तिथं गुडघ्यांवर बसून त्यानं आठदहादा डोकं टेकलं. मग उठून त्यानं तांदळाची आलमिनी ताटली हाती घेतली. टाकांसमोरच्या जागेत त्यानं त्या तांदळांनी मारुतीची ओबडधोबड मूर्ती काढली. पुडी उघडून तिच्यावर शेंदूर पिस्कारला. आयशीनं पेटती धूपदाणी शेजारी आणून ठेवली, अन् तीत धूप टाकला. तत्क्षणी त्याचा धूर वर उसळला, अन् झोपडीभर झाला. झोपडीच्या दाराशी शेंबड्यालेंबड्या पोरांची खूप गर्दी झाली होती. लंगुट्यानं त्यांच्यावर खेकसून त्यांना बाजूस पळवलं.

“ पळता, का उलटं टांगून ठिऊ ? ”

तेव्हा मग गर्दी थोडी विरळली. थोडी, फार काही नाही.

नाग्या कुडाच्या भिंतीशी दोन्ही हात छातीशी बांधून ओलेताच उभा होता. बानं त्याला खुणावताच तो पुढं झाला. बानं देवापुढं नमस्कार केला होता, तसा त्यानंही केला. पुढं काय करावं, अशा गोंधळात पडलेलं पाहून लंगुट्यानं त्याला आगाऊपणं सुचवलं,

“ आर बा अन आयशी– ”

सगळ्यानी माना डोलवीत संमती दिली,

“ व्हय्, त्येंच्या पाया पड की ! ”

नाग्या बा अन आयशी याच्या पाया पडला. मग त्यान आपल्याच बुद्धीनं बाकीही सगळ्याना खाली वाकून नमस्कार केला. दोन्ही हात उचलून त्याला आशीर्वाद देत भगुल्या म्हणाला,

“ आमच्या पाया कशाला पडतू ? ”

मग बानं खूण करताच नाग्या त्याच्यासमोर मांडी घालून बसला. बानं त्याला म्हटलं,

“ धुपावर दोन्ही हात धर – पालथे. ”

नाग्यानं हात धरल्यावर बा मंत्र सांगू लागला —

तांबडा हानूमान् – फाका तीर —

नाग्या पाठोपाठ म्हणू लागला,

तांबडा हानूमान् – फाका तीर – नाल गुतत फकीर –

सोळा गिरानं – नव लाख
मानसां – बांधून घालूं–
ननलाख इद्या – बांधून घालूं–
नागाची मूठ – गुंजे शिवणी –
तिथं माजी पडली नंदर –
तिथं पडली सुर्व्याची किरण –
नही पडे तर –
तांबडा हानूमान् फाका तीर
बारा गांवची शीव बांधू
भुताळीची विद्या बांधू
खैस बांधू
हडळ बांधू
चेडा बांधू
येताळ बांधू
भुताळ बांधू
गाउलीच्या रानचा
गोपाळ बांधू
नही बांधीस तर
तांबडा हानूमान् फाका तीर –

भूत काढायचा मंत्र झाला. धुपाचा धूर संपताच आयशी पुन्हा धूप टाकीत गेली. मग दृष्ट काढायचा मंत्र झाला. मग दूध उडालेल्या म्हशीचं दूध परत आणायचा मंत्र. असं बाजवळ जे जे होतं, ते ते त्यानं नाग्याला दिलं. आता त्याच्यापाशी भगतगिरीतल काही राहिल नाही.

सगळं संपल्यावर बा उठला. त्यान नाग्याला जवळ घेतलं. मिठी मारली. म्हणाला,

"अरे नांग्या, ह्या सगला सांभाल. उतूं नको, मातूं नको. वाईट वकटा करूं नको. आपली साधना खंडूं नको. कुणाच्या वाटी जाऊं नको. कुणी वाटी गेला, त त्याला डंखल्याबिगार ऱ्हाऊं नको!"

नाग्यानं डोळे पुशीत मान डोलावली. मग बानं त्याला डुईला पंचा बांधायला

सांगितला. त्यात त्यानं मोराची पिसं खोवली. म्हणाला,

"नांग्या, आतां उघड्या डुईनं हिंडायचा नही. जा! झाडद्येव, वाघोबा, साती आसरा, वीर, सुपड्याद्येव, लिंगोबावरचा म्हाद्येव – अवघ्यांच्या पायां पड. मग सगली जानकार मंडली—त्यांच्याबी पाया पड."

नाग्या निघाला. त्याच्याबरोबर पोरं निघाली. नाग्यानं सगळ्या वाडीभरच्या देवांना नमस्कार केले. वाडीशेजारी एका झाडावर तांबडी हिरवी आलवणं लटकवलेली होती. तो झाडदेव. पलीकडल्या टेकडीवर वाघाटीच्या वेलाखाली वाघदेव होता. ओढ्याकाठी साती आसरा. अशी वाडीची प्रदक्षिणा झाली. सगळ्या देवांच्या पाया पडणं झालं. मग नाग्या लिंगोबाकडे तोंड करून उभा राहिला. हात जोडून काय पुटपुटला ते कुणास कळे. एक पोर म्हणालं,

"काय म्हन्तो र!"

नाग्यानं नुसतं त्याच्याकडं पाहिलं. तो बोलत नाही, हे पाहून पोरं खिदखिद हसली. त्यांच्याकडे लक्ष न देता नाग्या वाडीत वळला. सुंभ्याच्या झोपडीशी जाऊन तो त्याच्या पाया पडला. लुकलुकणारे डोळे त्याच्यावर रोखून सुंभ्या म्हणाला,

"नवा भगत! आज राती नाचायचा का?"

तेवढ्यात बाहेर आलेल्या बानं म्हटलं,

"नाचायचा र सुंभ्या नाचायचा!"

"मंग ढोलिया कोन आजपून?"

"तुजा नवा भगत–"

"आन् जुना भगत र?"

"नव्या ढोलियाला इद्या घिली, तवाच जुना ढोलिया खपला! मरून गेला."

त्या रात्री बानं ढोलाला बोट लावलं नाही.

कडुसं पडलं, अन् बानं नाग्याला भुत्याच्या अंगणात ढोल घेऊन पिटाळलं. नव्या भगताच्या दीक्षेचं आजूबाजूच्या ठाकरवाड्यातून कळलं होतं. नाग्याची थाप ढोलावर पडली. त्याचा थरारा रानभर घुमू लागला. तशी वाडीतली ठाकरं

तर भुत्याच्या अंगणाकडे धावलीच, पण शेजारच्या ठाकरवाड्यांनाही पाय फुटले.

खोल्वणीपलीकडल्या झापावरला लखमा ठाकर खांद्यावर घोंगडी टाकून इकडे निघाला, तेव्हा झोपडीच्या दाराशी उभी राहून चिंधी म्हणाली,

" कुठं निंघाला र म्हताऱ्या ? "

लखमा सात पावलं परत फिरला. मग चिडून म्हणाला,

" इच्यारलीस ? "

" आरडाया कां झाला ? निस्ता इचारला, कुठं निंघाला ! "

" वाजवना ऐकला नही ? "

" मी येऊं ? "

हताश होऊन लखमानं म्हटलं,

" न्हवऱ्याच्या घरीं नांदत नही, आन् ढोल आइकतां निंघाली भिंगरी ? "

" असा कसा न्हवरा करून घिला ? धडाचा ना बुडाचा ! बुळा निस्ता ! मासकी तरी उडवता येती का ? आरं तो मला भितो ! "

लहानपणापासून चिंधी आईच्या माहेरी होती. लखमानं तिचं लगीन करताना तिच्या नवऱ्याकडून पंचवीस रुपये घेतले होते. ते परत केले असते, मग तिच्या नवऱ्याची चिंधी न नांदल्याबद्दल काही तक्रार नव्हती. पण एकेक रुपया गाडीच्या चाकाएवढा. एवढे गाडगंभर रुपये आणायचे कुठून ? चिंधी नवऱ्याबरोबर नांदत नव्हती, अन् लखमा त्याचे पैसे परत करू शकत नव्हता. चिंधी नवऱ्याला टाकून बापाकडे आली होती. तिची आईस खपली. चिंधी घरी आल्यामुळं बापाला जेवायला दुवक्ती मिळत होतं खरं, पण अशी आगजाळ पोरगी, हाही एक काहारच होता.

लखमा थांबून पुन्हा निघाला. त्याला चालू लागताना पाहून चिंधी म्हणाली,

" मी यीन ! "

ती लगेच येत्येय् की काय, या धास्तीनं लखमानं पावलं लगबगीनं उचलली. तो उतरण उतरू लागला, तेव्हा त्याला ऐकू आलं,

" जाशील त जा एकला ! मी मांगून यीन ! "

लखमा आपल्या पोरीला ओळखीत होता. ती बोललेलं करणार. सोडायची नाही. क्षणभर त्याला वाटलं, की थांबावं. हारलो म्हणावं. आपणच जाऊ नये. पण मग त्याच्या ध्यानी आलं, की पोरीच्या मनात वाजवणं भरलं असेल, तर

ती मी न गेलो तरी जाणार. राहायची नाही. मग आपण तरी इतकं चांगलं वाजवणं हातचं का दवडावं, असं चिंतून लखमा पावलं उचलीत भराभरा निघाला.

चिंधी बराच वेळपर्यंत होती तिथंच उभी राहिली. हळूहळू चहूकडे शांत झालं. झापातल्या झोपड्यातून पेटलेल्या चुली विझल्या. दारू खाणं जास्त झाल्या-मुळं कुठं कुणी बडबडत होतं, तेवढंच. त्यापरतं कुणाचं अधिक आगळं बोलणं नाही. कुत्री मात्र हेल काढूकाढू भुंकत होती; बहुधा कुणी जनावर झापा भवताली फेऱ्या घालीत असावं.

ढोलाचा घनगंभीर आवाज आता चांगला स्पष्ट ऐकू येऊ लागला. कधी मोळी घेऊन चाललेल्या एखाद्या ठाकरपोरीसारखं ते वाजवणं. कधी मोराच्या नाचण्यासारखं. कधी आभाळात गडगडावं, तसं छाती भरभरून टाकणारं. कधी पावसाच्या हलक्या सरीसारखं नुसतं अंग भिजवणारं. मऊसूत. कधी झाडावर कुऱ्हाडीचे घाव पडावे, तसं एका तालातलं.

चिंधी उभ्या उभ्या ते वाजवणं ऐकत होती. मग तिला नकळत तिचे डोळे मिटले. नुसतं ते वाजवणं. मन भरून टाकणारं. बोलणं बंद करणारं. अंगातून जशा न कळत्याच्या लहरी धावताहेत. एकीमागून एक. तलावातल्या लाटा एकी-पाठोपाठ धावाव्या तशा.

चिंधीनं डोळे उघडले. आकाश सगळं चांदण्यांनी भरलं होतं. लिंगोबाचा बुधला त्या काळोखातही अंधुकसा दिसत होता. वाजवणं त्या दिशेकडे चाललं होतं. एकदम चिंधीनं पाऊल झोपडीबाहेर घातलं. पण मग पुन्हा आत शिरून तिनं कोयत्याची आकडी कमरेला लटकावली. दार ओढून घेतलं. ती मोठ्या गतीनं ठाकुरवाडीकडे निघाली.

रानच्या माणसाच्या पायांना डोळे फुटतात. उंचनिंच कळतं. दगडधोंडा उमगतो. अंधारातही त्याची पावलं त्याला नीट वाटेनं, न ठेचाळता घेऊन जातात.

एखाद्या हरणीसारखी अगदी सहज चिंधी काही क्षणांत झापाचं टेकूड उतरली. ठाकुरवाडी अन् झाप यांच्यामधे सागाचं जंगल होतं. लिंगोबाच्या डोंग-राच्या घळीतून एक ओहोळ निघाला होता. वाकडातिकडा वाहात, थांबत, थबकत तो वाडी अन् झापाच्या मधून पार खाली निघून गेला होता. त्याला ओलांडून पायवाट वाडीकडेवर निघत होती.

चिंधी आपल्याच नादात चालली होती. लक्ष सगळं वाडीत घुमघुमत असलेल्या ढोलाकडे. त्यामुळं ओढ्याच्या भळीतल्या आडोशाला कुत्रं खात बसलेल्या तरसाकडे तिचं अवधान गेलं नाही.

तरसाची जात फार आधाशी. ल्वाल्वा मांसाचे ल्चके तोडायची. ते गिळताना हूं हूं आवाज करायची. ओढ्यातला तरस मोठ्या मजेत कुत्रं संपवीत होता, तितक्यात त्याला चिंधीची चाहूल लागली. तो सजग झाला. एकदा त्यानं दोन्ही पंजे अर्धफाडल्या कुत्र्यावर ठेवले. मग डोकं उचलून चिंधीचा अंदाज घेतला. ती जवळ येत असल्याच त्याच्या ध्यानी आलं, तेव्हा मग तो होता तिथंच गुरगुरू लागला. तोडावाटे नापसंतीचे आवाज काढू लागला.

चिंधी ल्वणाच्या ऐन तळाशी उतरली, तेव्हा कुठं तिच लक्ष तरसाच्या गुरगुरण्याकडे गेलं. मग ती पाऊल आखडतं घेऊन थावली. पाहिलंन तर डाव्या हाताला तरस मागचे फेंगडे पाय पसरून, कुत्रं त्याच्याखाली झाकून उभा होता. तो निवळ अंदाज घेत होता. भित्रं माणूस असलं, तर उगीच्च अंगावर गेल्यासारखं करायच. उलट तेच आपल्यावर चालून आलं, तर कुत्रं उचलून पलीकडल्या घळीत पळायचं.

चिंधीनं तरसाचं गुरगुरणं ऐकलं, तसा तिनं पायाखालचा धोंडा उचलून त्याच्याकडे भिरकावला, अन् म्हणाली,

"मेल्या! तुजा मुडदा गेला! हात् तुला तरमानं खाल्लं!"

त्या क्षणी त्या अंधारातही विचकलेले दात दाखवीत तरसानं कुत्रं जबड्यात धरून उचललं. दुसरा धोंडा चिंधीच्या दिशेनं आला, तसा तरस पलीकडल्या खोगळीत दिसेनासा झाला. चिंधीनं त्याचा अंदाज घेत आणखी एक धोंडा भिरकावला. पुन्हा तिच्या तोंडून शिवी उमटली,

"तुला खाल्ला तरसानं!"

आपण काय शिवी दिली, ते अचानक तिच्या ध्यानी आलं, अन् ती धूमधूम हसू लागली. अगदी लोटपोट झाली. हसणं कमी झालं. ती वाटेनं चालू लागली, अन् पुन्हा तिला आपलं शहाणपण आठवलं. तरसालाच आपण शिव्या घालीत होतो – तुला तरसानं खाल्लं म्हणून. काय मजा! या वेळी तर तिला फारच हसू आलं. इतकं की तिच्याच्यानं चालवेना. मग ती एका धोंड्यावर बसली. पोट धरधरून हसली. पुन्हा पुन्हा तिला हशाचा खिदखिदा येई. तोंडातून

फिसफिस हीही हूहू असं मजेदार उमटे. क्षणभर तिचं लक्ष त्या निरनिराळ्या स्वरांकडे गेलं. मग तर तिला अधिकच हसू येई. अशी चिंधी त्या बंबाळ्या रानात धोंड्यावर बसून एकटीच कितीतरी वेळ हसत राहिली.

अन् मग अचानक ढोल जोरजोरानं वाजू लागला. इतक्या जोरानं, की त्यानं सगळं अंतराळ व्यापून टाकलं. तो आवाज ऐकताक्षणी चिंधी भानावर आली. ती उठली, अन् त्या दिशेनं जवळजवळ धावूच लागली.

भुल्याच्या अंगणाशेजारी चार दोन टोणकं पेटत होती, अन् त्यांच्या विझत्या उमलत्या प्रकाशात ठाकरगडी नाचाच्या धुमाळीत रंगून गेले होते.

भवताली म्हातारे ठाकर अन् बायाबापड्या यांचा जरा मोठा गराडा पडला होता. एरवीपेक्षा गडबड आज जरा कमी होती. नवा भगत अगदी जीव लावून ढोल वाजवीत होता. बानं त्याच्यावर आजपासून ढोलियाच्या कामाचं ओझंही टाकलं होतं. एका अर्थानं ती त्याची परीक्षाच होती. रात्रभर तो ढोल वाजवू शकतो की नाही. ते वाजवणंही असंतसं तुनुमुनू नको. नाचियांची पावलं जे वाजवणं ऐकताक्षणी सरसरून उठावीत. आळश्यांच्याही अंगी वीज शिरावी. कधीकाळी तरुणपणी नाचलेल्यांच्या अंगी आगीचा लोळ धावावा. म्हातारपण झटकून टाकून त्यांनीही पायी चाळ गुंडाळावेत. मस्तपणं झुलावं. बेहोष होऊन नाचावं. असं आगळं वाजवावं, या रिशीनं तो ढोलावर बोटं चाल्वीत होता. त्या तशा थंडीच्या दिवसातही श्रमांनी त्याला घाम फुटला.

ठाकरांची झोपडी ओलांडीत चिंधी भुल्याच्या अंगणात पोचली, तेव्हा भुल्या गाणं सांगत होता,

> **" मायेच्या आसनी – देल्या हे परघरी**
> **देल्या हे परघरी – कामाच्या कसल्यांत "**

मोठ्या मायेनं वाढवलेल्या लेकी दुसऱ्याच्या घरी देऊन टाकल्या. तिथं कामाच्या भाराखाली त्या अगदी पिचून गेल्या आहेत !

हा कामाचा 'कसाला' नाग्यानं असा काही वाजवला! नेहमी कामात खपणारी चिंधी अगदी थक्क झाली. नाग्या ढोलावर परण वाजवीत होता: नाचिये नाचत होते. एरवी ढोल अन् नाचिये दोघे एक्या गतीनं चालत. पण या वेळी नाग्यानं अगदी कहर केला. ते गवत कापणं, ते ओझी बांधणं, ते फाटी गोळा करणं, ते मणामणाचे भार घेऊन उघड्या पावलांनी दगडादुगडातून चारचार कोस धावणं. ते आपट्याची पानं वेचणं. ते भातं कापणं. ते जमीन खोदणं. ते मासळी धरणं — तासन तास. असं किती किती. नाग्या ढोलातून काढी. अन् मग क्षणभर थांबून नाचिये चमत्कारून तो ढोलातला बोल नाचत.

अन् शेवटी रातचं उपाशी तापाशी उघड्या भुईवर हात उशाला घेऊन अंग टाकणं! ढोलातून निघालेली ती अगम्य भाषा नाचियांच्या ध्यानी आली. ते आश्चर्यानं थक्क झाले, अन् शेवटी अवघे जण दोन्ही हात कानाखाली घेऊन भुईसरपट झाले. ढोल अतिशय मऊ वाजू लागला. एरवी ज्याच्या थराऱ्यानं ढग गडगडल्यासारखं वाटे, तो ढोल जणू आता अगदी थकून गेला आहे. सुक्षम वाजतो आहे. कसातरी नव्हे, त्याही वाजवण्यात एक आर्त आहे. एक गळून जाणं आहे. भुईला शरण जाणं आहे.

नाग्यानं ढोलावर डोकं टेकलं होतं. वाजवण्याशी अगदी मिसळून जाऊन त्याचं वाजवणं चाललं होतं.

सगळे कसे अगदी श्वास रोखून ऐकत होते. कुणी कुजबुजत नव्हतं. कुणी खोकत नव्हतं. चाळाच्या घुंगरांचाही आवाज अगदी मंद मऊ येत होता.

असं ते वाजवणं सुक्षम होत होत थांबलं. नदीनं महानदीला मिळावं तसं. क्षणभर ते कुणाच्याच ध्यानी आलं नाही. पण जणू काय आता थांबायलाच पाहिजे होतं. अगदी व्हायला पाहिजे होतं ते झालं.

दुसऱ्या क्षणी बा आक्रंदत उठला. त्यानं नाग्यामागं जाऊन त्याला दो हातांची कव घातली. तसाच उचलला. वारंवार तो नाग्याचे मुके घेऊ लागला.

सुंभानं डोळे पुशीत म्हटलं,

"वा र वाजिवना! वा र नवा भगत! कसा नखित्रासारखा वाजिवना!"

मग प्रत्येक जण नाग्याला उराउरी भेटू लागला. त्याची पाठ थोपटू लागला. भुत्यानं धावत झोपडीत जाऊन शिशात जपून ठेवलेली मोहाची दारू आणली. शिसा नाग्याच्या तोंडाला लावीत तो म्हणाला,

" पे, लई दिसांची हाये. जपून ठिवली हुती. "

नाग्यानं निकरानं बाटली बाजूस सारली. म्हणाला,

" नही ! "

सगळे आग्रह करू लागले. सुंभानं आपल्या हाती शिसा घेऊन त्याचं बुचाण काढीत म्हटलं,

" आर पे ! भगताला चालती ! "

नाग्यानं पुन्हा नकार दिला.

" नही. "

" का र असा रीतीयेगळा वागतो ? बासंबूर लाजतो जनू ? "

बानं संपादणी केली.

" आजपून लाजायची गरज नही ! "

तरी मान हालवीत नाग्यानं म्हटलं,

" बाम्हून पेत नही. मी पुन्येवंत हुनार. मी पेनार नही. "

" आरं अलिकडं बाम्हूनबी पेयाला लागले. "

" पिऊं पिले तर ! मी पेनार नही. "

मग अवघ्यांची बोलती बंद झाली. अनायासे बुचाण काढलेलंच होतं. मग सुंभानंच शिसा तोंडाला लावला अन् संपवून टाकला. भुत्यानं पुन्हा चाळ खुळखुळवीत कानावर हात ठेवला. तवर विड्या पीत असलेले ठाकर सरसावले. नाग्यानं ढोलासमोर बसत त्याच्यावर टिपरू टाकलं.

चिंधी तोंडावर बोट ठेवून हे सगळं तारांगण पाहात होती. इतर बाया कलकलत होत्या. ती चिप होती. त्या विडया वळीत अन् फुंकीत होत्या. ती चित्रासारखी उभी राहिली होती. एकटक नजर नाग्याकडे. तो तिच्या मनी भरला. ती त्याला पिऊन जाऊ पाहात होती.

नाग्याच्या रूपात असं कुणा एकीच्या मनात भरण्याजोगं काही नव्हतं ! ठेंग्या बांध्याचा, सुमार अंगाचा नाग्या. पण त्याचं वाजवणं ? ते त्या रूपावर कडी करून गेलं होतं. अन् त्यानंतर ज्या निग्रहानं त्यानं दारूचा शिसा दूर लोटला, तो निग्रह ? वा वा ! ती तर फारच मोठी गोष्ट होती. अवघ्या ठाकरांच्या सृष्टीशी अनोळखी.

ठाकर गडी त्याला मिठ्या घालून भेटत होते, त्या वेळी तिला वाटलं, की

आपणही त्यांच्यात पुढं घुसून त्याला मिठी मारावी, काय हरकत आहे ? तिनं पाऊल उचललंही. पण तितक्यात नाम्या पुनः ढोलावर जाऊन बसला. बाजवणं सुरू झालं. नाचांची पावलं पडू लागली.

मग चिंधी पुढं सरली नाही. अंगणाच्या कडेला गच्च अंधारात निंबाचं लहानसं झाड होतं. मागं वळून ती निंबाजवळ गेली. त्याला टेकून उभी राहिली. रात्रभर. पहाटे पहाटे थंडी पडू लागली. ठाकरणींनी फडकी अंगाभवती गुंडाळली. चिंधी मात्र एखाद्या पाषाणाच्या पुतळीसारखी, एक पाय उचलून झाडाशी टेकलेली तशीच थांबली. थंडीचं झोंबणं तिला जाणवलंच नाही. तिची दिठी ढोलिया नाग्यावर खिळून राहिली.

आयशी कातावून म्हणाली,

"भगताची आई – बाईल होना मोठा पाप !"

वाकाची दोरी वळणं तसंच थांबवून नाग्यानं तिच्याकडे पाहिलं.

"नही त काय ? थोरला भगत ग्येला भगतगिरी करायला. धाकला भगत पका ढोलिया. आईस बरी भेटली रं तुम्हाला कमवून खाया घालणारी !"

वाक तसाच दूर लोटून नाग्यानं विचारलं,

"काय करूं ?"

"तूं काय करीतो र ?"

"का ? तूं पघ !"

"फाटी आन्तो का ?"

"हौ !"

नाग्यानं डोईला पंचा बांधला. कमरेस कोयतीचं फलाटणं अडकवलं. लंगोटी नीट सरशी केली, अन् तो वाडीबाहेर पडला.

कार्तिक अर्धा उलटला होता. सोनकीच्या रोपट्यांवरली पिवळी धम्मक फुलं पाकळ्या गाळू लागली होती. पावसाळाभर पाणी पिऊन झुडपांची हिरवी पानं काळपटू पाहात होती. रुखांच्या बुंध्यांवर पावसकाळ्यात जमलेलं शेवाळं रंग बदलीत होतं. आकाशात कुठ एकटदुकट ढगाची चिंधी उरली होती. ती

वगळता सगळं आकाश लख्ख मोकळं होतं.

नाग्या लिंगोबाचा डोंगर चढून वर निघाला. गेल्या पाळीला तो महादेवाच्या मुखाकडून हिंडून आला होता, तेव्हाच त्याला चार दोन झाडांवर वाळलेल्या फांद्या दिसल्या होत्या. त्यांची फाटी काढून आणायचं ठरवून त्यानं बुधल्याला वळसा घातला.

समोरच्या टेंबीवर उभा राहून तो आपल्या मनातलं महादेवाचं रूप त्या बुधल्यावर न्याहाळू लागला. उन्हाळ्या दिसात कडयाच्या पोटाशी उगवलेलं गवत वाळून कोळ होऊन जाई. वाऱ्याच्या लोटांबरोबर तें भुरुभुरू उडत असे. पुन्हा स्थिरावत असे. हे महादेवाच्या अंगावरले केस. दर उन्हाळ्यात महादेव म्हातारा होई. त्याच्या डोळ्यांच्या पापण्या पिकू लागत. त्याच्या मुखावर रूखेपण दिसू लागे. जणू ध्यान धरून धरून तो थकून गेला. वरच्या झाडाची पानं पार गळून जात. महादेवाची शेंडीही पिके. केस पांढरे होत.

भर उन्हात त्या बुधल्यावरून मृगजळाचे वाफारे धावलेले दिसत. ते तप-चर्येचं तेज. तें तेज तासनतास पाहात नाग्या ताटकळत उभा राही.

मग पावसकाळ्याची मेघांची फळी लिंगोबावर धरली जाई. नाग्याला वाटे, देवाला ऊन्ह लागतं. त्याचं अंग चटाचटा भाजतं. देव झाला म्हणून काय झालं ? त्याचंही अंग भाजणारच. मग तो डुईवर ही छत्री धरतो. तिच्या सावलीत तो ध्यान धरतो. ते मोडता उपयोगाचं नाही ना ? म्हणून. मोडलं, तर जगाचं होणार कसं ?

अचानक मेघांचं घनघोर बरसणं सुरू होई. मग देवाची आंघूळपांघूळ होऊ लागे. तेवढ्या त्या बुधल्यावर उतरणारं पाणी हे पाणी नसे, तर गंगामाई असे. तिच्या धारेखाली महादेव नहात बसे. तिचं धूमधूम बरसणं. महादेवाचं निवांत आंघूळ करणं.

पावसकाळ्याचे दोन अडीच महिने एकतर लिंगोबावर पाऊस असे. पाऊस नसे, तेव्हा डोंगर धुकटानं तरी वेढलेला असे. हे दोनअडीच महिने डोंगराचं दर्शन होणं कठीण. महादेवाचं ध्यान सुरू आहे. तो डोळे मिटून चिंतना करतोय. सगळीकडे पाऊस पडला की नाही. सगळी रानं जोगवली की नाही. अवघी धरित्री भिजली की नाही. कुठं उणं राहिलं असेल, तर त्या अंगाला तो मेघांना पाठवतो. त्याच्यापाशी लई मेघ. त्याच्या दाराशी हुकमाची वाट पाहात ते उभे

असतात. त्याच्या ध्यानात पटदिशी येतं, का अमुक एका डोंगराच्या घळीत पाऊस झाला नाही. तिथले ओढेनाले वाहिले नाहीत. खाचरं पाण्यानं तुडुंब भरली नाहीत. त्या रानचे बेडूक बोलू लागले नाहीत. तिथं काजवे लुकलुकू लागले नाहीत. तिथल्या कड्यांना गवतं वाढली नाहीत. कड्यांच्या पोटांशी भारंगीचे ठोंब उगवले नाहीत. चवेणीच्या कंदांना हिरवी पानं धरली नाहीत. त्या रानाला अजून भुईकमळं दिसू लागली नाहीत.

मग महादेव ढगांचा ताफाच्या ताफाच तिकडे धाडतो. ढग तिकडे सरू लागतात. कधी घाईघाईनं. एकापाठोपाठ एक. कधी एकमेकांच्या अंगावर कोसळत. कधी सावकाश. चुकार कामकऱ्यासारखे. पण शेवटी ते तिथं पोचतात. बरसायला लागतात. न बरसून करतील काय? टंगळमंगळ केलं, तर महादेवाचा बिजलीचा चाबूक काडदिशी पाठीत बसतो. केवढा आवाज होतो. डोंगर गदगदा हलू लागतात. अशा रीतीनं चहूअंगांना पाऊस पडतो.

मग महादेवाच्या ध्यानी येतं, की आता चहूकडे हिरवं झालं आहे. गाईगुजी जोगवू लागल्या आहेत. शेरडं चरू लागली आहेत. खाचरं जळानं तुडुंबलेली आहेत. भाताचे लोंबे जळाच्या साईवर डोकी उचलीत आश्चर्यानं चहूदिशांना बघू लागले आहेत. असं अवघं शांत झालं आहे.

मग हळूहळू महादेव ध्यानातून बाहेर येतो. ध्यानाला बसला तेव्हा तो जख्ख म्हातारा होता. ध्यानातून बाहेर पडतो, त्या वेळी तो जवान होऊन येतो. डुईवरचे केस पुन्हा हिरवेगार झालेले असतात. पापण्या पुन्हा ताज्या तवान्या झाल्या असतात. तो आपल्या डुईत भुईकमळं खोचतो. रंगारंगाची. बहुधा सगळी गुलाबीतांबडी. पण महादेवाला पांढरा रंग आवडतो. म्हणून तो काही पांढरी भुईकमळं अंगावर वागवतो. असा तो कोवळा दरदरीत दिसू लागतो. त्याच्या अंगावरून गंगाबाई खाली उतरत असतं. कुठं टंगळमंगळ करीत. कुठं धावत धडपडत. मग तो डुईवर एखाददुसऱ्या ढगाची चिंधुकली वागवतो, तेवढंच. यापलीकडे मग बाकी ढगांना तो दूरच्या गंगनी धाडून देतो.

पावसकाळाभर महादेवाच्या गळ्यातला मधमाश्यांच्या पोळ्यांचा हार गडचीप असतो. पावसकाळा उलटला, की मग त्यांचं गाणं सुरू होतं. ते गुंगुं गाणं काही फार मोठ्यानं ऐकू येत नाही. पण तरी हजारपाचशे माशी एक्या ठायी झाली, की मग चांगला घुमारा ऐकू येतो. कधी त्या गंगनात तिथल्या तिथं गाणं म्हणत

घुमतात. कधी नाच करतात. त्यांच्या नाचाला ढोलिया नको. माणसांचं नाचणं वेगळं. माश्यांचं वेगळं. या तिथल्या तिथं झुलतात. गिरक्या घेतात. असा नाच झाला, पुंजापाती झाली, की मग मध आणायला उडून जातात. पावसकाळा सोडला, तर बाकी आठ महिने माश्यांचं हें असं सुरू असतं. त्यात काही बदल व्हायचा नाही.

यंदाही सगळं रीतीप्रमाणं झालं. यंदाही महादेव ताजातवाना होऊन ध्यानातून बाहेर पडला. ते त्याचं दरदरीत रूप. ते त्याचं डुईत भुईकमळं खोवणं. ते हिरवेगार केस. त्या पापण्या. सगळं असावं तसं आहे. काही कमीजास्त नाही.

नाग्याला मोठं आश्चर्य वाटलं. देवाच्या हे सगळं ध्यानी कसं राहतं बा? जिथला दागिना तिथं कसा असतो दर साली? कधीच इकडचा तिकडे कसा होत नाही? कालची गोष्ट तर आपण आज विसरून जातो. कालचा बोल दुसरा. आजचा दुसरा. बोलण्यात बोलणं नाही. सगळा विसरण्याचा घोळ. पण मग देव कसा दिल्या वचनाचा पक्का? त्यानं एकदा सबूद दिलेला तो पाळतो तरी कसा?

पण मग नाग्याचं नाग्यालाच हसू आलं. आपण तरी येडमच आहोत. दिला सबूद पाळतो, म्हणून तो देव. पाळीत नाही, म्हणून आपण माणूस. पण आपणही आता सबूद पाळायला धडपडायचं. आयशीला फाटी आणतो म्हणून सांगितलं. फाटी न्यायची, अन्-

बाला सबूद दिला आहे. बाईटवकटं वागणार नाही. उतणार नाही, मातणार नाही. आपली साधना खंडणार नाही. दुसऱ्याच्या बाईबापडीकडे पाहणार नाही. तर तो सबूद पाळायचा. पुन्येवान व्हायचं. म्हणजे भाग्य जागं असलं, तर महादेव दिसल--त्याच्या ढवळ्या बईलावर बसलेला!

महादेवाला मोठ्या भक्तिभावानं नमस्कार करून नाग्या फाट्यांकडे वळला. लवणात एक हिरड्याचं झाड होतं. त्याची एक फांदी वाळली होती. नाग्या हिरडीजवळ पोचला. मोठ्या ऐटबाज रीतीनं, फांद्यांच्या वेचक्यांमधून तालात पावलं रोवीत तो एकदा झाडावर तर चढला. पण मग आठवण होऊन धसाधसा खाली उतरला. झाडापुढं त्यानं पुन्हा पुन्हा डोकं टेकलं. म्हणू लागला,

" झाडदेवा, आप्राध झाला. पायां पडलो नही. तसाच वर चहडलो. वाळली फाटीच तोडनार. वल्यांना हात लावनार नही. "

अशी माफी मागणं झाल्यावर मग त्यानं झाडाभवती पुन्हा कव घातली, अन् सरसरा वर चढला. वाळकी फांदी बरीच उंच होती. तो तिथपर्यंत येंगला. फांदीचं बेचकाट नीट न्याहाळू लागला. पण काही उमगेना. मग तिच्याभवती हातांची मिठी घालून नाग्या खाली लोंबला. तेव्हा त्याला कळलं, की फांदीला कीड लागली आहे. तिनं फांदीचा जीवनरस सगळा शोषून घेतला आहे. एवढं देखणं झाड. चहूबाजूंनी डवरलेलं. पण अर्धांग झाल्यासारखी तीच फांदी तेवढी वाळलेली. नाग्याचं बाळबोध मन दुःखी झालं. उसासून तो पुनः वर झेपावला. ती फांदी संपूर्ण खंडून काढायची. अगदी तळापासून. एक हात पलीकडल्या फांदीला देऊन त्यानं फलाटण्यातून कोयती काढली.

तो त्याला चार दोन आग्यामाश्या आपल्या डुईवरच्या फांदीत घोंघावताना दिसल्या. चमत्कारून तो त्यांच्याकडे पाहू लागला. या दिवसात हिरडीवर फुलं नसायची. फळंही गळून गेलेली. पालवीच्या शेंड्यांमधून कोवळी पानंच काय ती. तर मग या माश्या झेपावताहेत कशावर, हे काही नाग्याला कळेना.

काही वेळ त्याच्या डुईवर त्या घोटाळल्या. मग एकदम नाहीशा झाल्या. नाग्या स्वतःशीच हसला. म्हणाला,

" बायली ! चमित्कारच हाये ! माझं टकुरं मंजी काय मधानं बरबटल्यालं फूल हाय का ? "

तो खालून उत्तर आलं,

" व्हय र माज्या ढोलिया ! तूच मधाचा अख्खा घडा हायेस ! "

चमकून नाग्यानं खाली पाहिलं. हिरडीच्या बुंधाशी चिंधी उभी होती.

तिच्या मनानं पक्कं घेतलं होतं. नांदायचं झालं, तर याच्याबरोबर. वयानं लहान आहे हा जवान ढोलिया ! असू असला तर. मी त्याला फुलासारखा सांभाळीन. त्याच्यासाठी खपेन, झिजेन. हवं ते करीन. पण याची व्हायचं. दुसरी बात नाही. शेवटची गोष्ट.

पण हे सगळं याला सांगायचं केव्हा ? कसं ?

ती सारखी नाग्याच्या पाळतीवर राहू लागली. कधीकाळी तो एकटा सापडेल. घरी नाहीतर रानात. हे तिच्या म्हाताऱ्याच्या लक्षात आलं. तो कावून तिला

म्हणाला,

"ए फुंकण्ये, शेंगवेकराचे रुपये परत धिले नही आजून!"

तिनं साफ सांगितलं,

"नका दीनाम!"

"आन् त्यो चारधा गडी धिऊन तुला न्यायाला आला म्हंजी?"

"थुः! त्याड हाये का बायल्याला? रानवादर यिऊं तर दे, मेल्याच्या मणक्यात फाटंच घालत्ये!"

"पर आता नागियाच्या मागं का फिरती?"

"त्यो मला आवडला हाये. माजी प्रीत हाये त्येच्यावर."

"कडेवर उचलून घे त्याला!"

"घीन!"

"दुद पाजीन जा!"

"पाजीन र पाजीन! तुला बी यायची नही इच्यारायला, आन् तू करून दिलेल्या त्या भावल्याला बी नही! त्याच्या नरड्याला दोरी बांधून हितं झोपड्या-संबूर झाडाला टागून ठेवून द्ये!"

केलेल्या विनोदाच तिच तिलाच हसू आलं. फिदीफिदी हसली, अन् ती झोपडीबाहेर पडली. म्हातारा म्हणाला,

"आज गवत कापाया जायच हाये –"

"तू जा!"

"म्या पैसं घेतले – तुझे बी!"

"आन हिकडे!"

आता या उद्दाम पोरीला काय करावं, ते म्हाताऱ्याला कळेना झालं. पैसे तर खरंच घेतले होते. पण ते दारू खाण्यात खर्चूनही टाकले होते. नाकाला आलेली खाज म्हाताऱ्यान मनगटान खाजवून काढली, अन् तोंड वळवून बसून राहिला.

अशी चिंधी नाग्याच्या मागावर होती. त्याला सारखी पोरं घेरून असत. ती त्या पोराच्या अंगावरून जायची. घोटाळायची. नाग्या एकटा सापडायचा नाही. शेवटी आज तो सापडला.

तो लिंबोबाची सोंड चढत होता. तेव्हाच तिनं त्याला पाहिलं. पलीकडल्या

लवणातून. तिनं त्याच्या डुईचा बांधलेला नवा पंचा तितक्या दुरूनही ओळखला. तत्क्षणी ती वाघिणीसारखी उभा पहाड चढत त्याच्या मागं निघाली. त्यानं लिंगोबाच्या बुधल्याला वळसा घातला, तेव्हा तो तिला दिसेनासा झाला.

दगडधोंड्यांमधून अन् मधली झाडंझुडपं पार करीत ती धावतच चालली. वर चढली, तर तिला दम लागला. खाली वाकून तिनं नेसल्या लुगड्याला घाम पुसून काढला, अन् पलीकडे कोसळलेल्या एका धोंड्यावरून नाग्याला शोधू लागली. एकदा तिला वाटलं की, त्याला हाक मारावी. पण हाक मारण्यापेक्षा एकदम त्याच्यासमोर उभं राहाण्यातच अधिक गंमत आहे, हे तिच्या ध्यानी आलं. मग एक हात कपाळावर ठेवून ती त्याला शोधू लागली.

सूर्य बुधल्यापलीकडे गेला. पूर्वेकडल्या लवणात बऱ्याच दूरवर बुधल्याची सावली पडली. पलीकडे उतारात लांबवर फारेस्टची हद्द होती. जंगलखात्यानं जोपासलेली सागाची झाडं खाली बऱ्याच दूरवर पसरली होती. त्या झाडीपट्ट्या-पलीकडे लांब चिंबोरी अन् आपटं दिसत होतं, अन् त्यांच्या पाठीशी आडवी धावलेली सह्याद्रीची लांबच्या लांब माळ.

चिंधी नजर बारीक करून नाग्याला न्याहाळीत होती. तिला खात्री होती. आपल्या नजरेतून तो सुटतो कमा! तिला हिरड्याच्या झाडावर काही हालचाल दिसली. पाहिलन तर डुईला गुंडाळलेला तोच नवा पंचा. लंगोटी नेसलेला उघडा नाग्या हिरडीवर चढत होता.

त्या भल्या मोठ्या धोंडीवरून उडी मारून ती हिरडीच्या झाडाकडे निघाली. चिंबोरीहून ठाकरवाडीस जाणारी पायवाट याच धारेनं जात होती. त्या वाटेनं एक म्हातारी ठाकरीण अन् एक पोरगं अशी दोघं डुईवर ओझी घेऊन चालली होती. धावत चाललेल्या चिंधीला म्हातारीनं पुसलं,

"ठाकुरवाडी किती लांब?"

पण चिंधीनं एका शब्दानं उत्तर दिलं नाही. ती त्या दोघांच्या अंगावरून झपाट्यानं निघून झाडीत शिरली, अन् काही क्षणातच हिरडीखाली जाऊन उभी राहिली.

शेवटी तिनं त्याला गाठलं होतन्. असा हारवलेला नाग्या — त्याच्या ध्यानी चिंधीचं येणं आलंच नाही. तो खुळ्यासारखा फांदी निरखीत राहिला, अन् मग वर घोंघावणाऱ्या माश्यांशी बोलू लागला. येडपा कुठला! माश्यांबरोबर कुणी

बोलतं का ?

तोच् तो साधाभोळा नाग्या. मुद्रेवरला तो साधाभोळा भाव. ल्हानखोर अंग-बांधा. तीच ती जाड जाड बोटं. अंगावरून घामाच्या धारा वाहात असलेल्या. डुईला बांधलेला नवा पंचा. कितीतरी झाडांच्या कितीतरी चिकांचे डाग पडलेला.

तो माझ्याशी बोलला, चिंधी त्याच्याशी बोलली. चपापून त्यानं खाली पाहिलन. नजरेतले भाव त्याला कळलेच नाहीत. त्यानं विचारलं,

"काय पायजे ?"

चिंधी बोलली,

"तू पायजेस !"

आत्ता ! ही तर बाई ! साखसुरती बाई. काय करावं ? घाबरून नाग्यानं पुसलं,

"कशाला पायजे मी ?"

चिंधीनं ते त्याचं घाबरण पाहिलं. मग तो बावरा प्रश्न आइकला. तिला इतकं हासू आलं, की सांगता पुरवत नाही. हसता हसता ती अक्षरशः खाली बसली. असा कसा खुळा ढोलिया हा ? ज्याला नजरेची भाषा कळत नाही. ज्याला अस्तुरीचं शोधीत येणं कळत नाही. येडम्यासारखा विचारतो, कशाला पायजे मी !

तिचं हे अघोचर हसणं पाहिलन, अन नाग्यानं विचार केला, की बहुधा हिला भूत लागलं असावं. त्यानं वरूनच एकदा तिची मुद्रा न्याहाळली. पण ती काही भुतानं धरलेल्या झाडासारखी दिसेना. आता पुन्हा तिला कशाला हवा आहे मी, असं विचाराव तर ती पुन्हा हसू लागायची. पुन्हा तिला उकळा फुटायचा. तेव्हा मग बसेना का हसत, आपण आपलं फाटी तोडू लागावं, असा विचार करून नाग्यानं कोयती पाजळली.

चिधीनं हसू थांबवलं. त्याच्याकडे पाहात ती उभी राहिली. खोडाला हात देऊन तिनं म्हटलं,

"आर येडया, नवा भगत तूच नही का ?"

चाचरत नाग्यानं म्हटलं,

"व्हय्–पर का ?"

"ठाकरवाडीचा ढोलिया तूच नही का ?"

"व्हय्–नही–माजा बा–नही—मीच !"

" रानभरचे ठाकर तूच गोळा करीतो नाचासाठी—नही का ?"

घ्या ! एखाद्या झाडाला प्रश्न विचारावेत, तशी प्रश्नांची झड हिनंच लावली आहे. म्हणजे हा खूप उलटा न्याय ! नाग्यानं पुन्हा कोयती सरसावीत म्हटलं,

" काय काम आहे-सांगत का नही ?"

चिंधीनं दातांखाली ओठ दाबला. गंभीर होऊन ती म्हणाली,

" भुत लागलं हाये—"

अरेरे ! कुणालातरी भूत लागलंय, म्हणून ही आपल्याला बोलवायला आली. उगीच आपण घाबरलो. तर मग गेलं पाहिजे. भुताचा उतारा केला पाहिजे. पण अगोदर चौकशी तर करू या ! कोयती फलाटण्यात घालीत नाग्यानं विचारलं,

" कुनाला ?"

हातानं तोंडावरलं हसू झाकीत चिंधी म्हणाली,

" मला !"

अरेरे ! चांगली धिप्पाड. तरणीताठी. मघा चितलं होतं, तेच खरं तर ! *नाग्या तिथंच फांदीवर रेलला, अन् त्यानं विचारलं,*

" कव्हा लागलं ?"

डोळे मिटून बोटं मोजीत चिंधीनं म्हटलं,

" झाले दीड दोन म्हइने-"

" कुठं गेल्ती ?"

" नाचाला गेल्ती-पर वरून काय इचारितो ! खाली ये ना !"

हेही बिचारीचं बरोबरच आहे. खाली उतरून नीट पारख केली पाहिजे. पाहिलं सवरलं पाहिजे. भगतानं अशी टाळाटाळ करतां उपयोगी नाही. नाग्या खाली उतरू लागला, हे पाहून चिधी बुंधा धरून उभी राहिली. त्यानं अवघडून म्हटलं,

" सर दूर !"

" कशाला ?"

" मंग खालीं कसा उतरू ?"

" उडी मार–मी झेलीत्यें !"

नाग्या भयंकर लाजला. ह्याः ! एका बाईच्या अंगावर उडी घालायची ? तो

तसाच फांदीला लोंबकळून म्हणाला,

"दूर मर ना!"

चिंधी थोडी दूर सरल्यासारखी होऊन म्हणाली,

"हूं-घे-मरल्यें-"

नाग्यानं उडी मारली. मग दोन्ही हात झटकीत तो म्हणाला,

"सांग-कुठं गेली?"

हात पुढं करून चिंधी म्हणाली,

"आदुगर नाडी पघ!"

नाडी कशाला पाहायची? नाग्यानं तोंड वळवीत, तिच्याकडे पाहणं टाळीत म्हटलं,

"जरूर नही-"

"हाये जरूर! गुनवन्ताची नाडी येगळी असती. भुताची येगळी. असा कसा र तू येडा भगत?"

हे माहीत नव्हतं हा! बानं नुसता मंत्र दिला, हे गुपित काही सांगितलं नाही. बा भुतं काढीत असे, तेव्हा तोही नाडी पाहात नसे. बरोबरच आहे. बाच्या पुढं जी भुतानं धरलेलं झाडं येत, ती बहुधा सगळी म्हातारीकोतारी, अन् झपाटल्यानं कोळ झालेली असत. हे असं टवटवीत झाड बासमोर कधी आलंच नव्हतं.

मग नाग्यानं एकदा आवंढा गिळला. लंगोटीला घाम पुसला. तो म्हणाला,

"पघूं!"

चिंधीनं त्याच्या हाती आपला हात दिला. घामानं ओला झालेला. ती त्याच्या बावऱ्या मुद्रेकडे बघू लागली. आपलं हसू दाबू लागली. नाग्यानं हात हाती घेतला खरा, पण नाडी कुठं पाहायची, हे त्याला माहीत नव्हतं. त्यानं हात सोडीत म्हटलं,

"पघितली!"

लटकं रागावून चिंधी म्हणाली,

"आशी कशी र पघितली? नाडी अशी पघत्यात का?"

"मंग?"

"आन तुजा हात इकडं. मी दावीत्यें."

नाग्यानं आपला हात चिंधीच्या हाती देताच तिनं त्याला जवळ ओढलं, अन् हात आपल्या ओठाशी लावीत थरथरत म्हणाली,

"आर माज्या फुला ! येड्या भगता !"

नाग्यापुढं लक्ककन् उजाडलं. बाय रे ! ही दुसऱ्याची बाईबापडी. छे छे ! नव्हे नव्हे. पळालं पाहिजे. आपण पुण्यवन्त व्हायला पाहतो आहोत. ते काम नामेल.

जबर झटका मारून नाग्या तिच्या हातून सुटला. दूर पळत तो म्हणाला,

"नही नही–"

त्याच्या मागं धावत चिंधीनं विचारल,

"काय नही र येड्या पाखरा ?"

"तू दुसऱ्याची बाईबापडी ! मी पुन्येवन्त हुनार ! नर्कात पडन् ना मी ! दुसऱ्याच्या बाईबापडीकडे वाकड्या नंदरेनं पघितलं तर–"

दुसाऱ्याची बाईबापडी ! चिंधी थांबली. एकदम. बरोबर आहे. मी दुसऱ्याची बाईबापडी. हे बंधन तोडून टाकलं पाहिजे. मोकळी झालं पाहिजे. निर्मळ होऊन येड्या भगताकडे आलं पाहिजे.

टाकरवाडीत उंदीर फार झाले.

असे मुजोर, की दिवसादवळ्या झोपड्यातून हिंडायला लागले. परळांतून मांडलेल्या पेजेकडे थोडं दुर्लक्ष झालं, की परळाच्या काठावर पुढले दोन पाय ठेवून चिचिर चिचिर पिऊ लागले. जरा हुड्त केलं, की बाजूस सरू लागले. पण मग चुलखण्डांमागं धावून नागलीच्या भाकरीवर तुटून पडू लागले. सद्याची मागुती कुरतडू लागले. भाताच्या भगुण्यातून उतरू लागले. झोपडीभर बिळं करू लागले. कांबरुणं धडुतं चावू लागले. शेवटी शेवटी वाट्यालोट्याही पळवू लागले.

असे ते जिवावर उदार झाले. झोपल्या गड्यांच्या खोटांचे चावे काढू लागले. चार मंडळी बसली असता त्यांच्यासमोर मुंडी टेकू लागले. पुढल्या दो पायांनी मिशा साफ करू लागले. ओपस्यांचा खकाणा काढू लागले. त्या जिभेनं चाटू लागले. काळ्या गुंजांसारखे काळेशार डोळे वटारू लागले. नजरेला नजर

भिडवू लागले.

बा •डुईवर मडकं घेऊन पाणी आणायला चालला. उंदरांनी पायाला काढलेल्या चाव्यावर सुंमानं झाडपाल्याचं पलिस्तर मारणं चालिवलं होतं. बाला पाहताच तो म्हणाला,

"थूत तुजी भगतगिरी!"

बा थांबून रागेजून बोलला,

"का र भगतगिरीला श्या देतो?"

"मंग काय पुंजा करू?"

"झाला काय?

"मामा चावला पघ!"

"मंतर घाल्!"

उदरांच्या लुसलुशीत मांसाच्या खमंग वासानं सुंभाची जीभ खवळली. लाळ गिळीत तो आक्रंदला,

"थूत तुजी ढोलियागिरी!"

"येडा! ढोलिया काय तुज्या थाळ्यात वोकला?"

"नहीं! तो खरा–"

"मंग?"

"आरे उंदरे का पाडीत नही?"

"हां हां! असा का म्हनीत नही?"

मग मडकं तिथंच ठेवून ते दोघे टाकर डोक्याला डोकं भिडवून बसले. बेत पक्का करू लागले. उंदीर फार मातले. त्यांना धडा शिकवलाच पाहिजे. आता तोही देवाघरचा जीव. भाताचा एकेक दाणा वेचून आणतात. रानातल्या बिळांमधून साठवतात. त्यांचा मागोवा घेत बिळं खोदली की पायलीपसा धान्य मिळतं. त्यासाठी कष्ट कसलेच करायचे नाहीत. तेवढं बीळ उकरलं की झालं.

रात्री बेरात्री त्यांनी बिळातून बाहेर निघावं. सपरात राहात असतील, तिथून खाली उतरावं. झोपडीभर हिंडावं. उष्ट्याखरकट्यात हाडकंफाडकं असतील, त्यांना चिकटलेलं मास कुरतडून खावं. क्वचित कधी गाडग्यांच्या उतरंडीमधून डोकावायलाही हरकत नही. हुडुत केलं, की पळून जावं.

पण हे मात्र फारच झालं. पायांना डासे काढायचे म्हणजे काय! अशा

काहारात तर भगताला दुसरा उद्योगच उरायचा नाही. वाडीभर ज्याच्यात्याच्या पायावर मंतर घालीत हिंडावं लागेल. तेव्हा उंदरांचा बंदोबस्त केला पाहिजे.

बान मान डोलावली. खुंटा हलवून पक्का करीत सुंभा म्हणाला,

" झालं ? "

" झालं–"

" येडया भगता, तू सवता कशाला अडकावीतो ढोल गळ्यात ? "

" नांग्याच्या अडकवं ? "

" त काय ? "

झोपडयांभवती ठाकरं उभी राहिली. हाती सोडगी घेऊन. चिव्याची अन् पाढरीची. चार ठाकरानी नाग्याला ढकलीत आणलं. कमरेला ढोल बांधून. पक्का करकचून. ठगणा ठुमका नाग्या. एवढा थोरला ढोल कवठाला काटूक जोडावं, तसं ते दिसत होतं. इथं हे काटूक कवठाला उचलून झोपडीझोपडीतून शिरत होतं.

नाग्या झोपडीत पोचला की बाहेरची ठाकरं हुशार होत. सोडगी उचलीत. इशारा होताच आत ढोलाचा थरारा उमटे. एकामागून दुसरा. तिसरा. चौथा. असे ते एकावर एक कोसळत. त्या थराऱ्यानी पोटात कालवू लागे. छात्या हदरत. पोरं किचाळू लागत. ठाकरणी हासूहासून पोराना गप्प करीत.

जिथं माणसाची ही अवस्था होई, तिथं उंदरांचा ठाव सुटे, यात नवल ते काय ! ते बिळातून निघून झोपडीभर धावू लागत. बेभान होत. दरदरदरत खांब चढून झोपडीवरल्या पेंढ्यात शिरत. पण पेंढ्याची पातीही ढोलाच्या थराऱ्यानं हालू लागत. वाजू लागत. बावरून घाबरून उंदीर पुन्हा धटाधट भुईवर उडया घालीत. वईवई धावत. अन् शेवटी दारातून बाहेर पडत. पेंढ्यातले पलीकडे मोकळ्यावर उतरत.

बाहेर झोपडी वेढून त्यांचे काळ उभे. हाती सोडगी घेतलेले. एकेका टोल्यात ते दोन दोन उंदीर मारीत. क्वचित एखादा कुपाटीत पळे. त्याच्या मागं काठया घेतलेली पोरं लागत. कुपाटी उसंकटून, दगडांचा गाडोरा ढासळवून ती उंदराला मैदानात आणीत. तो थकून गेलेला असे. धापा टाकू लागे. बावचळून

या मारेकऱ्यांच्या पायांमधून घोटाळू लागे. अवचित एखादं पोर त्याच्यावर पाय देई. त्याची शेपूट धरी. मग त्याला आपटून ठार मारी.

त्या दिवशी संध्याकाळपर्यंत ठाकरांनी उंदरांचे ढीग घातले. एकेका ढिगात शेशंभर उंदीर. जाडेरोडे. काळेभुरे. हुसकेपिचके. नरमाद्या. असा तो खाऊचा ढिगारा समोर पाहिल्यावर जिभा पाणावू लागल्या. म्हातारे म्हणाले,

" आवरा आता! धाईस उंद्रे न्हाऊं द्या जितं. पार बेणं काढून टाकूं नका! "

पण आवरायचं कसं? नाग्या तर कमरेचा ढोल सोडून झोपडीसमोरच्या अंगधुण्या दगडावर बसला होता. त्याच्याजवळ जाऊन भुत्या म्हणाला,

" का र बसला तसा ? "

" उगा ! "

" वाटा का घेत नहीं ? "

नाग्याला वाट्याचे दोन हिस्से. एक ढोलक्याचा. दुसरा भगताचा. हे वाटे निराळे काढल्याशिवाय उंदराना कुणी हात लावायचा नाही. आजपर्यंत असे उंदीर मारले, म्हणजे वा ढिगाऱ्यासमोर उभा राही. त्यातलं जवान, भरलेले, मऊलूस उंदीर बोटान दाखवी. पोर ते बाहेर काढीत. शेपट्या धरून उचलीत. त्याच्या झोपडीत नेऊन पोचवीत. आयशी प्रसन्न होई. मग ती त्यांचं कायवाय करी. कधी नुसते भाजीत असे. कधी मसाला घालून कालवण करी. बा अन् नाग्या त्या दिवशी दाबून जेवत. राळ्याच्या भाताशी उंदराचं कालवण असलं, म्हणजे आणखी काय पाहिजे ?

पण आज ज्या ढोलियान अवघी ठाकरवाडी ढोलाच्या थराऱ्यान हालवून सोडली, तोच उदास झाला. कोण जाणे का तो !

त्याच्यासमोर उकिडवा बसत भुत्या म्हणाला,

" कार येड्या रुसला ? "

" रुसलो कुठं ? "

" उठ ! तुपला वाटा घ्ये ! "

" मला वाटा नको ! "

भुत्या आश्चर्याच्या खाईत बुडाला. त्याच्या जोडीला आणखी चारदोन जण धावून आले. यायला पाहिजेच. एवढी खाद्याची रास समोर पडली, अन् अजून गणेशायन्मा होत नाही ! नाग्याला वाटा नको, हे भुत्याच्या तोंडून ऐकल्यावर

ते त्याला समजावू लागले—

" आर कुणी तुज्या इरुद गेला आसल तर आपुन गोत भरवू—"

" व्हयू, कायबाय करू, पर आता उशीर नको करू—"

" उंद्राला मुंगी झोंबाया लागली बिट्या !"

" ऊठूठूठूठ !"

एकानं अधीर होऊन नाग्याच्या बकुटास हात घातला. तो झिडकारीत नाग्या म्हणाला,

" मी यायाचा नही, वाटा घियाचा नही !"

कातावून तो म्हणाला,

" आर मंग यवढ्या कवळ्याल्म उंद्राची रास घातली कशाला ?"

" जा, तुमी खा !"

" तुजाबी वाटा ?"

" माजाबी वाटा !"

तवर सुंभा अन् चार जाणकार टाकरं नाग्याजवळ पोचली. हे चुकतंय्. उंदीर मरून फार वेळ झाला, तर तो वातड होतो. मग पहिली मजा राहात नाही. उगा लाकूड चघळल्यागत होतं. ही रास तार्जी आहे, तवर ती पोटात पोचली पाहिजे. थोरला भगत इथं नाही, तेव्हा आता नाग्याला आपणच समजावलं पाहिजे.

येताक्षणी सुंभानं नाग्याच्या दाढीखाली हात घातला. म्हणाला,

" उठ माज्या लेकरा ! काय कुनाचा चुकला आसल तर मापी घे !"

नाग्या रडवेला झाला. हे लोक असा गैरसमज करून का घेताहेत, ते त्याला कळेना झालं. तो उठून उभा राहिला. कंठरावून म्हणाला,

" कुनाचा चुकला ?"

" चुकू दे—कुनाचाबी चुकला आसल—"

" चुकला नही कुनाचा !"

" आर चण्डाळा, मंग वाटा का घेत नही ?"

" बांम्हून म्हंगाला, उंदीर खाना पाप हाये !"

" त्येच्या टकुरींत धोंडा पडला त्या बाम्हनाच्या ! कवा म्हंगाला र ?"

नाग्या काही खोटं सांगत नव्हता.

आपस्याला कुणाकडे सत्यनारायण होता. त्याच्यासाठी कुळसुंद्याचा जोशी आपस्याला निघाला होता. डोंगर चढताना त्याला धाप लागली होती. त्यानं धोतराचा ओचा खोचून घेतला होता. पुढल्या बाजूला सगळा घोळ गोळा झाला होता. अंगातून घामाचे लोट चालले होते. सदरा अगदी गच्च भिजून गेला होता. उशीर होईल म्हणून तो हाफत डोंगर चढत होता.

खिंडीत नाग्या बकरी चारीत उभा होता. त्याला पाहून जोश्यानं विचारलं,

" बाळा, आपटं किती लाब रे अजून ? "

" तें काय ! जवळ ! कुठं निघाला ? "

" आपस्याला. सत्यनारायणाची पोथी वाचायला. "

" बाम्हन ? "

" हो ! "

वा वा ! ही तर साक्षात पर्वणी ! नाग्याच्या मनात फारच होतं. कुणी बामण जाणकार गाठावा. चाकरमान्या नको. पोथी सांगणारा असावा. मग त्याला पुण्य म्हणजे काय काय ते विचारून घ्यावं. हा तर प्रत्यक्ष धर्मसिंधूच देवानं धाडून दिला !

जोश्यानं टकल्यावरची टोपी काढली. खांद्यावरल्या पंचानं घाम पुसला. क्षणभर तो धोंड्यावर टेकला. लगबगीनं नाग्या पुढं झाला. भुईवर डोकं टेकून त्यानं नमस्कार केला. हात जोडून म्हणाला,

" बाम्हना ! पुन्ये म्हंजी काय ? "

जोश्याला हबकाच बसला. त्याला वाटलं होतं. की हे ठाकराचं पोर आता तंबाखू मागणार. मुई आहे का म्हणून चौकशी करणार. गेला बाजार कुण्या दुखण्यावरचं औषध विचारणार. पण नाग्यानं हे जगावेगळंच केलं. बोंबलांच्या बाजारात मोगरीच्या फुलाचा वाटा आढळावा, तसं झालं हे. जोशी म्हणाला,

" कशाला हवं तुला पुण्य ? "

लाजून नाग्यानं म्हटलं,

" पायजे. पुन्येवन्त हुयाचं ! "

" आसूं दे आसं दे ! अरे, पुण्यवन्त व्हायचं म्हणजे बारा भानगडी आहेत!"

नाग्याचं तोंड चिमणीएवढं झालं. तो कुजबुजला,

" च्या मारी !"

".अरे तें फार आसतं. यज्ञ करण, याग करण, ग्रहाची शान्ती करणं, ब्राह्मण जेवूं घालणं, त्याना दान देणं-"

आवंढा गिळीत नाग्यानं पुसलं,

" आपलं सादं नही का काई ?"

" दहावीस पळसाचीं पान काढून आण. मग सागनो."

नाग्या धावला. थोडक्याच वेळात जोशी बुडून जाईल, इतक्या पानाचा ढिगारा त्यानं जोश्यापुढं घातला. हसून जोशी बोल्ला,

" ही जून काय करायची रे ?"

" मंग ?"

" कोवळीं पाहिजेत. पत्रावळी लावण्याजोगी-"

पुन्हा नाग्या धावू लागला. त्याला थाबवीत जोश्यान म्हटलं,

" आसू दे. काढूं याच ढिगातून शोधून. मग तुला काय व्हायच ? पुण्यवंत?"

" पुन्येवन्त !"

" पाखरं मारतोस कीं नाही ?"

" मारीतो-"

" मोराची शिकार करतोस कीं नाही ?"

" करीतो-"

" करीत जाऊ नकोस. केलीस तरी खात जाऊं नकोस."

मोराचं नाव ऐकताच नाग्याची जीभ पाणावली होती. त्यानं विचारलं,

" का बा ?"

" अरे, मोर हे सरस्वतीचं वाहन."

नाग्याच्या डोक्यात कसलाच उजेड पडला नाही. तो टकटका बघत राहिला. जोशी हासून म्हणाला,

" अरे येड्या, म्हंजे सरस्वती बसती मोरावर."

" मंग बसू बसली तर !"

" वा ! अरे ती देवी आहे !"

आत्ता नाग्याला कळलं. त्यानं डोकं हाल्वीत म्हटलं,

"आजपून नही खानार."

"झालंच तर उंदीर खातोम कीं नाही?"

"खातो– लय आवडत्यात."

"खात जाऊं नकोम."

"का त्रा?"

"अरे ते गणपतीचं वाहन. म्हंजे गणपती बसतो उंदरावर."

नाग्याचे डोळे पार आकाशाला भिडले. म्हणजे आहे का आता! गणपती म्हणजे महादेवाचा मुलगा. म्हणे त्याचं पोट खूप मोठं आहे. चांगलं आपल्या ढोलाएवढं. एवढ्या ढोल्या पोटाचा हा देव इवल्युश्या उंदरावर कसा बसत असेल? पळसाच्या पानांची गड्डी बांधीत जोशी म्हणाला,

"अरे तो देव आहे ना? उदरावर बसतांना तो जड असला तरी हल्का होतो."

तेव्हा आता उपाय काय उरला? आजपासून उंदीर खाणं बंद! जोश्यानं सांगितलं,

"अरे, चागलं वागावं. खोटं बोलूं नये. घडेल तो परोपकार करावा. देवाला आठवीत जावं. नमस्कार करीत जावं–"

"समद्या देवाना?"

"तर काय? एवढं केलंस कीं पुरे. तुझ्यासारख्याला याहून जास्त पुण्याची गरज नाही. कुळसुंद्याला येतोम कीं नाही कधी?"

"येतो–"

"मग कधींमधीं करवंद, भोकरं, वाकेरीचं भातं — असा रानचा मेवा आणीत जा. जोशी विचारलंम, तर कुणीही घर दाखवील."

नाग्याचं पुन्हा एकदा पाया पडून झाल्यावर जोशी डोंगरच्या वाटेला लागला होता. अशी जोश्यान आणभाक घातली होती. पायात आडंगा अडकवला होता. उंदीर न खाण, हे कितीही आवडण्याजोगं नसलं, तरी उपाय काय? त्यावाचून पुण्यवंत होण्याचा दरवाजा बंद राहणार होता.

नाग्यान हे सगळं सागितल, तेव्हा मग सुंभानं डोकं हालवीत म्हटलं,

"बरुबर बरुबर! नाग्या उंदीर खायचा नही." त्यानं एक उसासा सोडून

म्हटलं,

"पोरांनू, धाईस उंदीर भगताच्या घरीं न्या. नांग्याचा बा हाये -- आईस हाये—त्यांचाही जीव हाये. इक्ता चांगला मेवा!"

लवणातल्या आमराईत रात्रभर ढोलाचा धिंगाणा सुरू होता. कारण सगळ्यात उंच असलेल्या आंब्यावर एक भला दांडगा मोर अन् तीन लांडोरी बसली असल्याची बातमी पोरांनी आणली होती.

फारा दिवसात टाकरवाडीच्या जिभेला मोराचं मांस लागलं नव्हतं. दहावीस वर्षांपूर्वी इकडे खूप मोर होते. रानभर त्यांचं म्यांव म्यांव चालायचं. पावसकाळा दारात उभा राहिला, म्हणजे मोर आपला पिसारा फर्रदिशी उघडायचे. बेभान होऊन नाचायचे.

वर ढगांचं गडगडणं सुरू असायचं. एकदा या अंगाला. एकदा त्या अंगाला. मधूनच चमचमून जायचं. धरतीच्या पाठीवर कडाका उठायचा.

खाली मोरांचं थैथै. एवढा थोरला पिसारा. हजार डोळ्यांचा. तरवार तळपावी, तसा तो पिसारा चहू अंगांना फिरायचा. कधी थोडा ढिला पडायचा. कधी पुन्हा ताठ व्हायचा. थरथरू लागायचा. पीस अन् पीस कापायचं. जणू मोराच्या अंगी वीज भरलेली असायची. अशी रानभर मोरपिसं चमचमत असायची.

एकदम कसला रोग उठला कोण जाणे! रानात मोर दिसेनासा झाला. क्वचित कुठं एखादुसरं जोडपं आढळात येई. पोरं उतावळी होत. पण म्हातारे त्यांना चापीत,

"बेणं राहूं अजिबात निर्वंस करूं नका."

अलीकडे वारुळांभवताली चारदोन लांडोरी दिसत. एखाद्या सरपटत्या जनावराला टोचटोचून खात असत. पुनः मोरांचं म्यांवम्यांव घुमू लागलं होतं.

सुंभाच्या जिभेला काय झालं होतं, कोण जाणे अलीकडे. त्याला काहीच गोड लागेना. बेडूक आणून पाहिले. बाजाराहून बोंबील अन् सुकाट आणून पाहिलं. पण जिभेच्या चवेत कसलाच फरक नाही. पण मोराचं नाव निघताच

तिला जसा पाझर फुटला. पोरं तर अशा निमित्ताची वाटच पाहात होती. त्यांनी हेरून पक्की बातमी आणली.

पलीकडल्या झापावर एकाला दम्यानं लोळवलं होतं. त्याला औशीदपाणी करून नुकता थोरला भगत परतला होता. दारात घोंगडी पसरून तिच्यावर त्यानं मुंड टेकलं होतं. तो काठी टेकत टेकत सुंभा येऊन उभा राहिला गुडघ्यांवर तळहातांनी नेट देत तो बसला. एकदम त्यानं मुद्दयाला हात घातला—

" बोल भगता, मोहोरावर जायाचं. "

मान हालवीत थोरला भगत बोलला,

" मी नही यायाचा. "

" का र येड्या ? "

" राती झपाटल्यालं झाड यायाचं. देवलसी व्हायाची. "

" व्हय्. तू नही यायाचास. तुझी देवलसी चालायची. पर नाग्या ? "

दाराआड आयशी उभी राहिली होती. ती गागून म्हणाली,

" माजा नाग्या नही यायाचा. त्यानं मोहोर खाणं टाकलं. "

कंदरावरून सुंभानं म्हटलं,

" तुझा लेक बांम्हून होऊं द्ये ! संद्यापानी करूं द्ये ! पर आमच्या तोंडचा मोहोर का काढीता ? "

" कुनी काढीत नही. ढोल घिऊन जा. "

शेवटी बाकी ठाकरांनीच रात्र जागवायचं ठरवलं. तिन्ही सांजा उलटल्यावर मोर आंब्याच्या शेंड्यावर पोहोचल्याची बातमी आली, तशी ठाकरांची भुतावळ ढोल घेऊन राईत पोचली. त्यानी ढोल बडवणं सुरू केलं. ढोलाचा धुमारा आइकला, तसा मोर बावरून थेट वरच्या टाहाळ्यावर जाऊन पोचला. त्याच्या भारानं टाहाळा डोलला. मोराच्या पाठोपाठ लांडोरीही त्याच टाहाळ्यावर बसायला धडपडू लागल्या. पण गग त्याचा डोल पाहून त्या खालच्या टाहाळ्यावर फांदोरी गच्च धरून बसल्या. तिथूनच त्या कुरकुरू लागल्या.

दशमीचा चन्द्र जसा आकाशाचा मधवा सोडून ढळू लागला, तसतसा ठाकरांचा कालवा वाढला. ते मधूनच गाणी म्हणत. ओरडत. किंचाळत. ढोल बडवीत. पण वाजवणं वेगळं, अन् बडवणं वेगळं. ते ठाकर. चांगलं कसबी वाजवणं ऐकायची सवय असलेले. कुणीतरी बडवलेलं ऐकणं त्यांच्या मनास

येईना. शेवटी चिडून भुत्या बोलला,

"असा कसा मानसायेगळा नांग्या ? चाला र ! त्याला धरून आनूं !"

"नही त काय ? तूं खाऊं नको बाम्हून झालास तर !"

"पर ढोल तर वाजिवशील ?"

पाच सात तरणे गडी निघाले. तडातडा चढण चढून, झाडांच्या सावल्यां-खालून वाडीत पोहोचले. कुत्री भुंकू लागली. यानी लक्ष दिलं नाही. मोराच्या मासाला लालचावलेल्या ठाकरणी झोपल्या नव्हत्या. कुचकुचत होत्या. सूर धरून गोष्टी सागत होत्या. नागव्या पोरी पालथ्या पडून आइकत होत्या. शेंबूड भुरकीत होत्या. नाक वाजवीत होत्या.

"त का झालं, का झाडायवढा उच्च राकेस –"

गडी भगताच्या झोपडीशी उभे राहिले. थोरला भगत झोपला होता. घोरत होता. त्याच झपाटलेलं झाड आलंच नव्हतं अजून. भगतगिरीचा माड मांडून ठेवला होता. आयशी शेजारणीशी बोलत अंगणात पाय पसरून बसली होती. याना पाहताच म्हणाली,

"का झालं रे ?"

"नाग्या कोठाय् ?"

डोगराच्या दिशेन हात उडवून आयशी बोलली,

"आर त्यो येडा ! त्याच्या नादी कशाला लागऽता ?"

"पर ग्येला कुठं ?"

"माश्याचा उटाव अवचीत उठला. झोपडीवरून चालला. त्यो येडा गेला त्याच्या मागं तिकडे डोगुरावर !"

क्षणभर ते सगळे अवघडले. पण भुत्या म्हणाला,

"चला र ! असा काही प्रिथमी फोडून त जात नही !"

आयशीचं नागलीचं अटवल पिऊन झालं, अन् आयशी म्हणाली होती,

"गाडग्यांतला ऊद ठीव सोधून. फाटं आणून चुलीत घाल. निखारा हुईल."

"झाड येनार र बा ?"

बानं डोस्कं हाल्वलं होतं.

नाग्यानं देवर्स्कीचं सगळं मांडून ठेवलं. मग तो झाडाची वाट पाहात बसला. आता त्याला हे सगळं पाहणं भागत्र होतं. ही मोठी मोठी कामं बाच करीत होता. तरी त्याच्या तालमीत तयार होणं जरूर होतं. बराच वेळ झाला. प्रहर रात टळून गेली. तरी झाड येता दिसेना. घोंगडी अंथरून बा पहुडला. आयशी अंगणात चांदण्यात बसली. नाग्याही अंगणातल्या मेढीला टेकून पाय पसरून बसला. बसल्या बसल्या तो मागं उभा असलेला लिंगोबाचा डोंगूर न्याहाळू लागला.

चंद्र मध्यावर होता. त्याच्या उजेडात भुरका डोंगूर छाती काढून उभा होता. गाभाऱ्याची महिराप कानावी, तसं डोंगुराच्या ती बाजूंनी आकाश कातलं होतं. चांदण्यानी ते गच्च दाटलं होतं. सगळंच मोहोरबाणं दिसत होतं. कालच्या-सारखं आज नव्हे. रोज नवं. नव आणि अनोखं.

नाग्या ते अनोखं रूप चुपीत होता, तो गंगनातून माश्यांचा उठाव चालला. हजार माशी की दोन हजार, ते काही कळेना. शेपन्नास भुंगे घुमावेत, तसा तो आवाज. माश्या तिथल्या तिथं फिरत होत्या. आकाशात वेढे काढीत होत्या. त्याबरोबरच मंद गतीनं पुढं सरत होत्या. त्यांचा भला थोरला गुंतावा झाला होता. आयशी म्हणाली,

" आज रातींच्या कश्या निघाल्या ? "

तटकन नाग्या उठला. टेकून बसल्यामुळ मागचा लंगोटीचा तिढा सैल झाला होता. तो त्यानं घट्ट केला, अन् तो डोंगुराकडे जाणाऱ्या त्या उठावामागं धावत सुटला. आयशी म्हणाली,

" लांब जाऊं नको ! "

पण ते काही नाग्याच्या कानांपर्यंत पोचलं नाही. तो तसाच उठावामागं उधळला. लवण उतरून तो पलीकडच्या वाघदेवाच्या टेपावर पोहोचला, तेव्हा त्याच्या लक्षात आलं, की उठावाबरोबर धावणं काही आपल्याच्यानं व्हायचं नाही. तरी तो दरड चढून माथ्यावर गेलाच.

तिथं एक निंबाचं झाड. त्यावर चढलेला वाघाटीचा वेल. त्याच्या खाली वाघदेव. वाघदेवासमोर थोडकं पठार मोकळं होतं. पठारापलीकडे येकळी करवंदीच्या जाळ्या. दगडदुगड.

नाग्या पठाराच्या मध्यभागी पोचला, तोवर माश्यांचा उठाव डोंगुराकडे सरकून पैल पोहोचला होता. हळू हळू तो मोकळ्या आकाशातून डोंगुराच्या पोटात शिरला, दिसेनासा झाला. नाग्या तिथंच डोकीवर हात देऊन ती दिशा न्याहाळीत राहिला.

त्याच्या समोर महादेवाची पाठ. भली रुंद. वरती चांगली गच्च भरलेली गर्दन. तोंड पलीकडल्या अंगाला आहे. तरी डुईवरची शेंडी इथून अंधुक दिसते. आणखी चार पाच दिवसांनी पुनव. त्या रात्री तर ती शेंडी लख्ख दिसेल.

पुनवेची आठवण होताच नाग्याचं अंग शहारलं. त्याच्या अंगावर दरदरून काटा आला. पुनवेच्या रात्री महादेव ढवळ्या बैलावर बसतो. राहाळभर हिंडतो. झाडाझुडांची वास्तपुस्त करतो. झाडांच्या कवळ्या शेंड्यांवरून हात फिरवतो. फुलं गोंजारतो. फळं न्याहाळतो. तुळशीच्या मंजिऱ्यांचा वास घेतो. सबजाचा मान करतो. ढवळा बैल घाटरं वाजवीत पांधी पार करतो. आमरायांखालून निघतो. शेतापोतातून हिंडतो.

महादेव अवघ्या ठाकरवाड्यांवर नंदर फिरवतो. असं सगळं न्याहाळून पाहून होतं. सगळं जिथलं तिथं आहे. काही कुठं हललं नाही, की गमावलं नाही. एखादा ठाकर खपला, पण तोही याच धरतीत विसावला. मातीला माती मिळाली. जमाखर्च जिथल्या तिथं. घाटा नाही की तोटा नाही.

असं हिंडता हिंडता पहाट होऊ येते. ढवळा बैल गुपित होतो. महादेव पुन्हा निचळ बसून ध्यान करू लागतो. हे सगळं पुनवेदिशी होतं! होतं अन् पुन्येवन्ताला दिसतं. तो दिहाडोळ्यांनी हे सगळं पाहू शकतो.

आपण तितके पुन्येवन्त झालो का? का अजून काही उणावा आहे? कधी तरी हे सगळं जगाआगळं आपल्याला दिसेल का? कधी काळी एवढी एक मनशा पुरी होईल का?

नाग्या डोंगुराकडे टक लावून पाहात राहिला, तो त्याला माश्याचा उठाव पुन्हा या आंगाला येता दिसला. तो निरखू लागला—

बाय् रे! कसं हे! त्या उठावामागं ते चकाकतं काय धावतंय? देवीमाशी की काय? हो हो!

नाग्या नुसता मोहोरला. हात उंचावून तो धावू लागला. आपल्याला शेवटी

देवीमाशी दिसली ! ती काय तिथं ! सावकास येत्येय खरी, पण सोन्याचांदीची देवीमाशीच ती !

“ नाग्या ! र ऽ नाग्या ! ”

हाक घुमली. ती ऐकताच नाग्या एकदम उभा राहिला, अन् मग हाकेच्या दिशेनं आरडत धावू लागला.

भुत्या अन् बाकी ठाकर त्याला शोधीत येत होते. त्यांनी पिसाटासारख्या धावत येत असलेल्या नाग्याला बघितलं. भुत्या म्हणाला,

“ काय दिसला रे याला ? कंचा ग्याव ? ”

तोवर नाग्या त्यांच्याजवळ येऊन भुत्याच्या दंडाला झोंबला. कापत म्हणाला,

“ तं पघ ! ”

“ काय ? ”

“ देवीमाशी ! ”

“ कुठं ? ”

“ त्या उठावामागं — ती लाव ! ”

निरखून हासत भुत्या म्हणाला,

“ येड्या ! तो सायबानं गंगनांत सोडलेलं फिरता गिऱ्या ! ”

खिन्न होऊन नाग्या म्हणाला,

“ असा ? ”

तो भुत्याला सोडून त्या दिशेनं वेड्यासारखा धावत दरड उतरून दिसेनासा झाला.

भुत्या म्हणाला,

“ आतां र ? ”

उसासून गडी म्हणाले,

“ चला, आपुनच जाऊं ! आतां मोर पेंगाया आला आसल्. दिऊं दनक उडवून. पडल्याबरुबर एका टोल्यांत पार ! ”

त्याच्याकडे दुर्लक्ष करून भुत्या म्हणाला,

“ या येड्याचं कसं व्हायचं ? ”

उनाड मैनेवाणी रानं पालथी घालीत हिंडणारी चिंधी. मनाला येईल तेव्हा घरी परतणारी. वाटेल तशी उत्तर देणारी. नव्या ढोलियाच्या मागं भिरीभिरी भटकणारी. हिला अचानक झाल तरी काय ? की भुतान झपाटलं ? की देवचारानं धरल ? की आसरानी धरून घोळसल ? ही अशी सुतासारखी सरळ कशी आली ?

सकाळी आपली उठली, अन् आढ्याला खोचून ठेवलेला विळा काढून म्हणाली,

"साग म्हताऱ्या, कुठ जायाच गवत कापायला ?"

लखमा दचकला. क्षणभर तो आनंदला. म्हणाला,

"आपटीच्या रानातल्या शेलदरीत—"

भाकरीच गठुळं कमरेला बाधीत चिंधी म्हणाली,

"मी निघत्ये पुढ. तू सावकाश ये."

"आर पर तिच्या ! मला यिऊं दे की !"

"मग मी काय तुज्या रस्त्यात आडवी पडली का ?"

निघाली, अन् तरातरा चालू लागली. तोट खगाडून, विळा घेऊन लखमा निघाला. वाटेत शेरड घेऊन उभ्या असलेल्या खोकीला त्यानं विचारलं,

"खोकी, चिंधी दिसली का कुठं ?"

"कवाची गेली ! वाघणीवाणी ! खिड उतरून आपट्याला पोचली आसल येधूळपर्यंत !"

झपाझपा पाय उचलीत लखमान खिड ओलाडली, अन् पलीकडल सागाचं रान पार करून तो आपटीच्या रानात शेल्दरीत जाऊन दाखल झाला. पाहातो तो अजून गवतावरली टाकर येताहेत, अन् चिंधी मात्र भुतासारखी गवत कापायला भिडली आहे. चमत्कारून तो तिच्याजवळ जाऊन म्हणाला,

"इतक्या येरवाळींच कशाला कापीती गवत ? येऊं द्यायचं होतंस अवघ्याना !"

चिंधीनं नुसतं त्याच्याकडे पाहिलन्. उत्तर काही दिलं नाही. तिचा झपाटा चालूच राहिला. पाहाता पाहाता तिनं भल थोरल रान भुंडं करून टाकलं.

साबाजी अगदी खूष झाला. इतर गवतकाप्यांना तो टोमणे देऊ लागला. ते काहीबाही उत्तरं देऊं लागले, म्हणजे म्हणू लागला,

" थूत तुमची ! अरे ती पोरगी काय हत्तीच्या कानांतून पडली का रे ? "

अशी तशी भाकरी खाल्ली, अन् चिंधी पुन्हा गवतावर भिडली. असा तिचा झपाटा, की गवताबरोबर एक दुतोंडही तिनं गवत म्हणून कापून टाकलंन.

संध्याकाळी ती साबाजीपुढं जाऊन हात पसरून उभी राहिली. साबाजी अचंब्यानं म्हणाला,

" काय मागती ? पैशे ? "

" हूं ! "

" घिले तुझ्या म्हाताऱ्याला—अदूगरच ! "

" त म्हताऱ्याला इच्यार ! माझे मला दे ! "

" का रे ? ए लखमा ! "

लखमा होता तिथूनच आरडला,

" घेतले पैशे चिंधी ! "

पण चिंधी हात मागं घेईना. म्हणाली,

" म्हताऱ्याकून वसूल घे करून तुपले पैशे ! माझे मला द्ये ! "

साबाजीनं विचार केला, की हिला असंतुष्ट करून उपयोगी नाही. नाहीतर उद्या पुन्हा यायची नाही कामावर. त्यानं मुकाट्यानं खुर्दा मोजला, अन् चिंधीच्या हातावर ठेवला. तो कनवटीला लावीत चिंधी कमरेला विळा खोवून झपाट निघाली. कातावलेला लखमा म्हणाला,

" आताही येऊ देत नही मला ? "

" ये सावकास. चुलींत कुनाचीं हाडं घालूं ? तुझीं का माझीं ? "

लखमानं मागं वळून ठाकरांशी संपादणी केली,

" बरुबर हाये तिचा. घरांत फाटा न्हाई ! "

घरी आली, अन् चुलीमागं खड्डा करून चिंधीनं पैसे त्यात ठेवून दिले. कुणाला न कळे असे.

लखमाला वाटलं, की बरं झालं. न का देईना मला पैसे. काम तर करू लागली ! हळू हळू ताळ्यावर येईल. जाती कुठं ? मग एके दिवशी चार जण मिळून समजावू. नवऱ्याच्या घरी नेऊन पोचवू. त्याला सांग . आता

सांभाळ तुपली बायकू. पैशेबियशे काही मिळायचे नाहीत. म्हणजे एक खटलं निवारलं.

पण त्याच्या ध्यानी आलं, की हे रोजच असं होतंय्. चिधी कामाला जाते. भुतासारखं काम करते. आपली मजुरी आपण घेते. काय करते तिचं कुणाला ठाऊक!

गवत कापणं संपलं की ती रानात जाते. फाटी तोडते. कुणाबरोबर बोलत नाही की गप्पा करीत नाही. मैतरणी हात धरून अडवू लागल्या तर त्यांना झिडकारते. नव्या ढोलियाचं नाव घेऊन चिडवू लागल्या, तर त्यांच्यावर डोळे काढते. जगाआगळी मोळी बांधते.

एरवी ठाकराची मोळी म्हणजे काडीवर काडी ठेवून बांधलेला इमला. नुसता दिखाऊ. पोकळ. एवढा थोरला दिसायला. पण मूठभर फाटी काही हाती यायची नाहीत. एरवीचा साधाभोळा ठाकर मोळीच्या बाततीत लुच्चेपण करीत असायचा. तीच परी गवताच्या भाऱ्याची. ओली पेंडी पिसकारायची. भली थोरली दिसेल असं करायचं. पिसाऱ्याचा भाग दो बाजूंस रचायचा. मग तो फुगवटा डुईवर घेऊन हिंडायचं.

पण चिधीची मोळी गच्च भरलेली. दोन गड्यांना सहजासहजी उचलायची नाही. अशी मोळी उचलून वाघिणीसारखी दबत दुडक्या चालीनं ती पेठेत पोचते. बाकी मोळकऱ्यांना पाय दुखून येईपर्यंत " मोळी घ्ययची का मोळी!" असं आरडत हिंडावं लागतं. लालचभरल्या डोळ्यांनी गावभरची तोंडं निरखावी लागतात.

कुणी निरिच्छपणं विचारतो,

" केवढ्याला दिली मोळी?"

" तिचा सांगितला दीड दीड रुपया!"

तो उदासीन तुकाराम-ज्ञानेश्वर म्हणतो,

"चार आण्याला टाकायची असेल, तर इथं टाक. नाहीतर जा गाव फुंकीत."

मग पंधरा वेळा तिथल्या तिथं मागंपुढं करणं. भावटाव होऊ देणं. समजूनं का मागत नाहीस, अशी विनवणी करणं. अन् शेवटी दीड रुपया सांगितलेली मोळी सात आण्याला देऊन परतणं.

पण चिंधीला यातलं काहीच करावं लागत नाही. घेवारीच तिच्या मागं लागतात. सांगेल तो दाम देतात. कुणी चावट मोळी उतरू लागताना अंगाला अंग घासतो. तेवढीच मजा. पण चिंधी तांबडे डोळे करून त्याच्याकडे बघते. मग पुढं सरायची हिंमत बिच्चाऱ्याला होत नाही. ही आग कुणी ओतून घ्यायची अंगावर ?

कडू इंद्रावनं, गेळ्याची फळं, वाकेरीचं भातं, हिंगणबेटं—काय हाती लागेल ते चिंधी गोळा करते. तो सगळा पसारा फडक्यावर मांडून पेठेत रस्त्याच्या कडेला बसते. भराभरा विकून दाम कडोसरीला लावते. संध्याकाळी घरी येते, तेव्हा झोपडीचं दार आडवं करते. पैशांचं काय करते ते कुणास ठावं !

लखमाला काळजीही लागली, अन बरंही वाटलं. हिला कुणी झपाटलं असो, तो झपाटा चांगला आहे. भला आहे. पोरगी सुधारली. दुसऱ्याचं धन ते. असं नीट मार्गी लागलं, की आपला भार उतरला.

गप्पदिशी त्याला धसका बसे, की हा झपाटा हारवला तर ? पहिल्यापरीस अधिक उंडगी झाली तर ? मग काय करायचं ? चिंधी म्हणजे जळती गोवरी. पदरात बांधून न्यायची सोय नाही. बोलायला जावं, तर फणाणा उधळते. नाकावर माशी टिकू देत नाही.

काही का असेना, पोर नीट वाटेनं चालायला लागली, हेही काही थोडं थोडकं नाही.

एका संध्याकाळी लखमाला प्यायची खूप मय झाली. कडोसरीला दमडा नव्हता. अगदी हुमसून हुमसून आलं. त्यानं आत डोकावून बघितलं. त्याला आठवलं, की चिंधी मोळी घेऊन गेली, ती काही अजून परतली नाही.

मग त्यानं चहूबाजूंना बघितलं. झडपा लावून घेतला. हळूच चुलीजवळ गेला. गाडगी शोधू लागला. मडक्यांच्या उतरंडीत हात घालून पाहू लागला. काही कुठं गावेना. शेवटी त्यानं भुई चाचपायला सुरुवात केली. ती सगळी उखळलेलीच होती. इतर झोपड्यांप्रमाणं नीट चोप दिलेली नव्हती.

लखमाचं मन तेवढ्यातल्या तेवढ्यात खंतावलं. इतरांच्या भुया पाहा की ! कशा लख्ख नेटक्या असतात. चापून चोपून आरशावाणी केलेल्या. तेल सांडलं तर निपटून घ्या. चिंधीची आय होती, तोपर्यंत आपल्या झोपडीतली भुईही तशीच असायची. पण तिला माती देऊन आलो, तेव्हापासून असा उकिरडा

झाला. चिंधीला बोलायची तर सोयच नाही.

तेवढ्यात त्याला चुलीमागं भुई पोकळ असल्याचा भास झाला. त्यानं भरा-भरा त्या भागावर रचलेली फाटी बाजूस सारली, अन् उकीर वर काढला. पाहिलं तर खरंच ! आत गाडगंभर तरी नाणी होती !

आधाशासारखी लखमानं मूठभर हाती घेतली तो झडपा वाजला. लखमा पट्टदिशी उभा राहिला. बघितलन्, तर डोळ्यातून आग बरसवीत चिंधी उभी होती !

कमरेची कोयती हाती घेत ती म्हणाली,

" टाक खाली ! "

लखमाच्या हातातून नाणी खाली साडली. डोळे काढीत चिंधी बोलली,

" पुन्ना हात त लाव ! "

भिजल्या कुत्र्यावाणी लखमा झोपडीबाहेर पडला. त्याच्या मनी तर खूप उमळलं. चार उणेदुणे शब्द बोलावेत. मुलगीच आहेस, घेतले कधी काळी चारआठ आणे म्हणून काय झालं. असं म्हणावं. पण मुखावाटे काही फुटलं नाही.

उन्हाळा सुरू झाला.

डोंगुरावरला महादेव पुन्हा म्हातारा झाला. त्याच्या अंगावरलं लांबलांब गवत मगळं वाळून गेलं. भरारा वारा सुटे. त्याच्या लाटांबरोबर ते ठिकच्या ठिकाणी आपटू लागलं. महादेवाच्या डुईवरल्या झाडाची पानं गळून पडली. नाग्या उमासून म्हणाला,

" अर माज्या देवा ! कशी र तुजी दशा ! "

नागलीवरीच्या कणग्या पार मोकळ्या झाल्या. आढ्याच्या लगीला टांगून ठेवलेल्या, क्वचित कुठं दिसणाऱ्या मकईच्या माळाही दिसेनाश्या झाल्या. भात तर कधीच गुप्त झालं होतं. जेमतेम बीबियाणाची डालगी शेणानं लिंपून ठेवलेली शिल्लक राहिली. कुठं कुणाकडं तर तीही फुटली. जगू वाचू तर वाढी-दिढीनं आणून घेरू. पोटाला अन्न तर पाहिजे ?

ठाकर जवानांच्या छातीच्या फासळ्या दिसायला लागल्या. गालफडं बसली. मोसमात तीनतीनदा भाताची भुगणी सफै केलेल्या ठाकरांच्या मुखी एका वेळी पेज लागणंही कठीण झालं. मग त्यांनी फासे अन् वाघुरा बाहेर काढल्या. शेतातली कामं जेमतेम उरकली की ठाकरगडी पाखरांच्या अन ससांच्या मागं धावू लागले. त्यांनी मारलेले फेकलेले धोंडे जाळ्याजाळ्यातून अडकू लागले. जाळ्यात बसलेले ससे बावरे होऊन पळू लागले. आरडाओरड्यानं रानं गर्जून गेली.

थोरल्या भगताचं ठीक चाललं होतं. उन्हाळा लागला असला, तरी भुताखेतांनी काही काशीयात्रेसाठी प्रस्थान ठेवलं नव्हतं. ती झाडांना धरीत होती. झाडं घुमत होती. भगताच्या हातच्या छड्या ग्वात होती. कोंबड्याअंड्यांची निवदबोणी देत होती. भुतं तेवढ्यावर संतुष्ट होऊन झाड सोडून मुक्कामावर जात होती. भगताच्या घरी सुपं भरभरून कोंडाकणी पोचत होती. नाग्या पेज पीत होता. रात्रंदिवस ढोल घेऊन बसत होता. कधी नानापरींचे चमत्कारिक परण काढीत होता. कधी ढोलाच्या खोडावर डोकं टेकून रितेपणात बुडून जात होता.

तो ससाघोरपडींच्या शिकारीला जात नव्हता. पाखरामागं धावत नव्हता. मासळीसाठी ओहाखोड्यातली डबकी उपशीत नव्हता. असा तो बामणावाणी पुन्येवंत व्हायला धडपडत होता, तरी ठाकरांच्या गळ्यातला तन्मणी होता. त्याला हजार अपराध माफ होते. त्याच्या ढोल वाजवण्यावरून अवघा राहाळ ओवाळून जात होता.

भुत्या अन् चौघंजण तीन ससे अन् दोनतीन पाखर मारून परतले. भुत्या एकदम थाबून म्हणाला,

"काय र! लई दिसांन नाच झाला नहीं!"

"गडी शिकारीमागं पांगलेले!"

"नाग्याचा ढोल आइकला का सगळे जमा होत्याल."

"आज हूंग्या!"

"हूंग्या आज!"

परतता परतता भुत्यानं नाग्याला निरोप दिला. नाग्या थरारला. सांज होताच तोढोल घेऊन भुत्याच्या अंगणात जाऊन बसला. अंगणाच्या मधुमध सूत्रन

त्यानं ढोलावर कांडकं टाकलं, तशी ठाकरवाडी सजग झाली.

आज नाग्यानं निराळंच वाजवणं काढलं होतं.

उन्हाळी वाहुटळी रहाळभर हिंडू लागल्या, अन् त्यांनी नाग्याला झपाटलं. वाहुटळी गरगरत निघून जात. रितेपण मागं ठेवून. एक पोकळी. एक उदासी. ती उदासी बाणासारखी नाग्याच्या हिरद्यात शिरे. त्याला वाटे, काही करू नये. हात वर उचलावेत. मोकळं व्हावं. वाहुटळींमागं धावत सुटावं. धाडकन जाऊन लिंगोबाच्या डोंगुरावर आदळावं. देवाला विचारावं, असं का? हे भकासपण का? ही चहूबाजूनी दाटलेली, भाजू घातलेल्या शेतातल्या धुराची काळोखी का? ही वाहुटळीतली पान गरगरत वर का चढतात? पुन्हा पंख तुटल्या पाखरांसारखी खाली का गळतात? वेळूच्या वेटातून भिरभिरणारा वारा काय बोलतो? पानझड झालेल्या सागाच्या धुडांशी तो का झुंजतो? ठिपक्याएवढ्या दिसणाऱ्या घारी या दिवसात काय निरखतात? गगन दिवसा उंच का जातं? रातचं खाली का येतं?

अशा मनीच्या वाहुटळीनं तो अगदी गांगरून गेला होता. नाचाचं आवतण मिळताच त्याची जाडी बोटं फुरफुरू लागली. भुत्याच्या अंगणात त्यानं ढोलावर कांडकं टाकलं अन् काही चमत्कारिक वाजवलं.

कांडक्यानं धुमपुडावर संथ लयीत एकेक दमदार ठोका. उजव्या हातानं घुमित्कार. ढोल गंभीरवाणा बोलू लागला. डाव्या हाताचे ठोके तसेच सुरू. उजवीकडलं पूड शोकगीतं गाऊ लागलं. कळ. थेट मनाला भिडू लागली. अस्वस्थ ठाकर गोळा झाले. त्यांनी घुंगरांच्या माळांच्या ढिगातली एकेक माळ उचलली. पायांभवती गुंडाळली, अन् मुकाट्यानं डाव्या ठोक्याबरोबर पाऊल टाकीत ढोलाभवती फिरू लागले. दोन्ही हात सैल सोडून.

काय नाचावं ते उमगेना. तोंडातून शब्द फुटेना. एरवी ठाकरगीत अन् ढोल — असं दोघांचं राज्य चाले. आज एकटाच ढोल उदासवाणा घुमू लागला. गाणं सुचेना झालं. भुत्या अगदी गोंधळून गेला.

काठीच्या आधारानं उभा असलेला सुंभा कातावून म्हणाला,

"तसं गप गप र का?"

पावलं टाकणं न थांबवता भुत्या म्हणाला,

"सुसत न्हाई गानं!"

"गा की कुंचंबी!"

ढोलाकडे हात करून भुल्यानं म्हटलं,

"हा वाजिवना! थांबूबी येत नहीं — गाऊंबी देत नहीं —"

नाचियांनी धरलेल्या रांगेतून आत शिरून सुंभा नाग्याजवळ बसत म्हणाला,

"ए नया भगत! का रे तमलं ते वाजिवनं?"

नाग्यानं डोळे उघडून एकदा केवळ सुंभाकडे बघितलं, अन् पुन्हा ते मिटून घेतले.

वाजवण्यातली आर्त वाढली. जणू वाजवणारा सगळ्या सृष्टीशी एकाकार झालाय्. उन्हाळ्यामुळं तिचं हृदय फुटतंय. उकलतंय. दोन शकलं होताहेत. तो आर्त भाव याच्या उरी उमटला आहे. उजव्या हातावाटे तो पुडावर वाजतो आहे. बारीक, मुक्त होऊन. नाचियांची मन कलबलताहेत. खच्चून आरडावंसं वाटतं, पण शब्द काही फुटत नाही. चेतना केवळ पायात उरली आहे. ते गतिमंत झाले आहेत. डाव्या पुडाच्या ठोक्याबरोबर भुईवर पडताहेत. पुन्हा आपोआप उचलले जाताहेत. ठोका वाजताक्षणी भुईखाली उतरताहेत.

सगळे ठाकर गप्प. नाचियेही, बघियेही. निवळ ढोलाचा आवाज, अन् घुंगरांचा. अशी जादू होऊन गेली. जणू कुणी मंतर घातला आहे.

रात्रीचं पाऊल पुढं पडत चाललं. नाच मात्र होता तिथंच थबकला. स्वता-भोवती फिरणाऱ्या भोवऱ्यासारखा. काही गावं, हा भावही मनीच्या मनी मुरला. जणू दारू खाल्ल्यासारखे झुलत ठाकर नाचिये नुसते गोल गोल फिरत राहिले —

तो आरोळी फुटली—

"धावा रे! भगताला सरपानं खाल्ला!"

थोरला भगत औशीद घ्यायला शेजारच्या पाड्यावर गेला होता. तिथून परतताना अंधारात त्याचा नागावर पाय पडला. नागानं करायचं ते केलं. फणा उंच करून पिंडरीला दोन ठिकाणी कडाडून डसला. भगतानं बोंब ठोकली. ढोलाचं वाजवणं ऐकून वाडीकडे निघालेल्या चारदोन ठाकरांनी ती ऐकली. त्यांनी भगताला खांद्यावर उचललं. धावत वाडीकडे निघाले. नाग्याजवळ पोचले, तंवर भगत काळानिळा पडला होता.

नाग्याचं वाजवणं हादरलं. त्यानं डोळे उघडले. क्षणभर त्याला अर्थबोध

झालाच नाही. पण कुणी मारलेली हाक त्यानं ऐकली—

"नांग्या ! तुजा बा !"

तसा तो उठून एकदम उडालाच. ठाकरांनी घेरलेल्या बाबर कोसळला. थोरल्या भगताला झेंडू फुटला होता. अंग थरथरत होतं. दाताच्या फटीतून रक्त वाहात होतं. कुणी धरून नाग्याला मागं ओढलं. म्हणालं,

"आर, त्याला नांगानं खाल्ला रे !"

नाही नाही ! नाग्या पुण्यवंत होतांय्. तो पडवळ खात नाही. उंदीर खात नाही. मोराला तोड लावीत नाही. खोटं बोलत नाही. कुण्या आईबापडीकडे ढुंकूनही पाहात नाही. कडक साधना चालली आहे त्याची. त्याच्या बाला नाग चावणार नाही. तो चावू शकतच नाही.

पिसाटासारखा नाग्या उठला. उधळत तो दरड उतरून निघाला. खाली लवणात हिरडीखाली नागदेवाचा धोंडा होता. त्याच्यासमोर जाऊन बसला. धोंड्यावर डोस्कं आदळू लागला. आक्रंदू लागला,

"अरे नांगदेवा, कंदी तुज्यासंबरून नमिस्कार केल्याबिना गेला नही ! तुजी सम्दी पाळना केली. माज्या बानंबी ! मीबी ! तू बाला डसू नको !"

नाग्यानं त्या धोंडयाला गच्च मिठी मारली. धोंडा छाती एक केली. अगदी श्वास कोंडू आला, तरी धोंडा सोडला नाही. जणू तो त्या धोंडयाशी एक होणार. दगड छातीत रुतवून घेणार—

तो वर रडू फुटलं. सगळा कालवा झाला. ठाकरांनी धावू धावू झाडपाल्याचं औषध आणलं. भगताला चाटवलं. पण तो काहीही उपाय करण्यापलीकडे पोचला होता. त्यानं एकदा चहूदिशांना नाग्याला शोधलं, अन् आयशीच्या मांडीत मान कलथी केली. तिनं हंबरडा फोडला.

तो हंबरडा नाग्याची छाती चरचरा चिरीत गेला. त्याच्या विश्वासाला एक बारीकसा तडा गेला. धोंडयापासून दूर सरून तो आक्रंदला,

"नांगधेवा रे ! त्वा माजा बा खाल्ला चण्डाळा !"

लखमा दोन्ही हात कपाळावर ठेवून बसला होता. नुकती त्यानं अर्धी विडी ओढून संपविली होती, अन बाकी अर्धी कानावर नीट खोचून ठेवली होती. मग तो रित्या मनानं बसून राहिला होता. डोळे मिटून.

तो धसर्दिशी झापड उघडली, अन् चिंधी बाहेर येऊन त्याच्यासमोर उभी राहिली. तिच्या हाती एक गठुळं होतं, अन् कमरेला कोयती.

लखमानं लखकन डोळे उघडले. ते मटामटा उघडीत मिटीत तो चिंधीकडे बघू लागला. ती कोरड्या स्वरात म्हणाली,

"चल ऊठ!"

"कुट?"

"शेंगव्याला!"

कसाबसा धडपडत उठत हरिखल्या स्वरात लखमा म्हणाला,

"नांदायला?"

"त्या मळ्याच्या डोमल्यावर पैका वतायला!"

लखमा अवघडला. त्याचं बकुट धरीत चिंधी म्हणाली,

"चल!"

कापायला चालवलेल्या बकऱ्यासारखा लुगुलुगु लखमा चिंधीमागं चालू लागला. त्याच्याच्यानं असं साहस काही करवलं नाही, की तिला काही रुसावं-पुसावं. तावभरल्या वाघणीसारखी खिडीरानं पार करीत चिंधी चालत राहिली. तिच्या पाठोपाठ पाय घाशीत लखमा. दोघांची अंगं धुळीनं अगदी भरून गेली.

वाटेत एका मोहाखाली चिंधी थोडा वेळ थांबली. तिनं फुलं वेचली. मूठभर लखमाच्या हाती कोंबली. बाकी आपण तोंडात टाकली. लखमा म्हणाला,

"जरा मंदी तर चालशील!"

चिंधीनं नुसतं त्याच्याकडे पाहिलं. बोलली नाही. थोड्या वेळानं घाम पुसून तिनं पुन्हा वाटेवर पाऊल घातलं. देव ऐन माथ्यावर पोचला अन् ती दोघं शेंगव्याच्या ठाकरवाडीत पोचली.

चिंधीला पाहताच कालवा झाला. गर्रदिशी ठाकरवाडी तिच्याभवती गोळा

झाली. पण एका हाती कोयती घेतलेल्या चिंधीला निरखून मोठ्यानं बोलायचं साहस कुणाला झाल नाही.

मधे खळवाटी होती. तिच्या एका अंगाला चाफ्याच झाड. भवताली ठाकरांच्या झोपड्या. झाडाखाली चिंधी उभी राहिली. लखमावर गुरकली,

" हांक मार मुर्दाडाला ! "

लखमा गेला, अन् थोडयाच वेळात परतला. त्याच्या मागोमाग ठाकरवाडीतले म्हातारे आले, अन एक्या अंगाला घोळका करून बसले. ते लखम्याला म्हणाले,

" बोल काय म्हनीतो ? "

" तोडाया आलो ! "

" पैका ? "

" आन्ला ! "

पैका आणला, हे ऐकताच मात्र सगळ्यांचे चेहरे उजळले. आता दारू खायला मिळणार, हे ध्यानी येऊन त्यांच्या जिभा पाणवल्या. मग त्यातल्या एकानं म्हटल,

" बलवा न्हवऱ्याला ! "

चार पोर गेली, अन् मेंगळदाण्या नवऱ्याला ढकलीत घेऊन आली. त्याला पाहताच चिंधी पच्दिशी थुकली. तो आला, अन् तोंड खाली घालून मंडळीच्या घोळात बसला. पाच मिनिटं केवळ पोर कलकलत राहिली. बोललं कुणीच नाही. शेवटी एका म्हाताऱ्यानं तोंड फोडल,

" गोत गोळा झाला. हूत्रा बोलना ! "

दुसऱ्या एकान म्हटल,

" बोलियाचा काय ? पैका परत द्या, दारू खायला धाईस रुपै द्या ! का काडी तोडून मिलल् ! "

चिंधी तोफेवाणी कडाडली,

" दारू खायला पैका घ्या त्या नवशाकून ! वीस अन् पाच रुपयाच्यावर फद्याबी मिलायचा नही ! कबूल आसल् तर बोला. नही त जा उडत ! "

तिचा स्वर ऐकून गोत नरमलं. नाहीतरी चिंधी नादत नाहीच. दारूसाठी पैका नवऱ्याकडून काढता येईल. पंचवीस रुपये मिळताहेत, हेच काय कमी

आहे? म्हातारा बोलला,

"न्हायला दारू खाना! वीस अन् पाच रुपै काढा!"

चिंधी पुढं सरत म्हणाली,

"व्हा बाजू!"

गोत बाजूला सरलं. चिंधीनं कोयती समोर ठेवून पोटळी सोडली. सगळा खुर्दा होता. तिनं तो मोजून गड्ड्या घालायला सुरुवात केली. म्हातारा म्हणाला,

"आर, कुनी मदतीला या! ए न्हवऱ्या, जरा हात लाव की!"

चिंधी गुरगुरली,

"हो मागं!"

तो बापडा पाऊलभर मागं सरला. चिंधीनं पंचवीस रुपयाचा खुर्दा मोजला. कोयती हाती घेतली. म्हणाली,

"थू त्या पैक्यावर! दे र मल्या काडी मोडून."

ती पैक्यावर थुंकली. तेव्हा थोडा कालवा झाला. पण रुपये समोर असल्या-मुळं त्याच्या भाराखाली तो दबला. आख्ख्या पंचवीस रुपयाच्या त्या चळती पाहून अवघ्यांनी माना डोलवल्या. म्हणाले,

"पैका मापून घेतला, आता काडी मोडून दिली पायजे."

एकानं नवऱ्याच्या हाती काडी दिली. त्यानं कशीबशी ती मोडली, अन् चिंधीपुढं टाकली. चिंधी खुदकन् हसली. म्हणाली,

"बाप्पर म्येला! वर पघायचा धीर हुईना त्याला!"

मग म्हाताऱ्यांनी पैशांवर डावल्या मारून ते गोळा केले. एकजण दारू आणायला धावला. चिंधी निघत लखमाला बोलली,

"चलतो का?"

दारूची मडकी समोर येत असता निघायचं? छे! भलतंच! लखमा तिथंच भुईला चिटकत म्हणाला,

"तू हो मोहोरं!"

पिंजऱ्यातून सुटल्या मैनेगत चिंधी जणू तरंगत चालली.

थोरला भगत गेला, अन् तो धक्का एकदम जाणवला.

तो होता तोपर्यंत पायलीपसा धान्य येत होतं. आठाचौ दिशी एखादा नारळ घरी येत होता. कधीमधी एखादं कोंबडं. पण आता ते बंद झालं. धाकट्या भगताच्या भगतगिरीवर एकदम कुणी विसबेना झाला. त्यामुळं घर एकदम खाली आलं.

घर ? हो, घर. इतर ठाकराच्या झोपड्यांपरीस जरा अधिक बरं. कुडाचं असलं म्हणून काय झालं ? चागलं नऊदहा हात लाबरुंद होतं. एक्या अंगाला बकऱ्या अन गाय बाधायची जागा. एक्या अंगाला चूल. चुलीवर वाशाच्या कामट्याचा माळा. त्यावर भगतगिरीच सामान. कोपऱ्यात देव. मोरपिसाचा कुंचला.

कुड कंबरेपर्यंत शेणामातीन सारवलेला. वरनी फटी मोकळ्या. आतल्या बाजूस देवाच्या वरतां कुड चुन्यान लिपलेला. त्यावर गेरनान स्वस्तिकं काढलेली. पाची बोटं जुळवून उमटवलेली. जागोजाग. समोरच्या भिंतीजवळ लाकडी माच. त्यावर गोधड्या अन घोंगडी. त्याच्या शेजारी कणग्या.

बा भगत होता, तसा हौशी सुतारही होता. घराच लाकूड त्यानं फारेष्टातून आणलं होतं. स्वतः तासल होतं. जिथल्या तिथ बसवल होतं. माचाच्या खांबा-वर त्यान मोर काढले होते. आढ्यावरही नकमकाम केल होतं. खांब कोरले होते. अस त्यातल्या त्यात त्यान घर देखणं केल होतं.

घरी शेतपोत नव्हतं. काही गरजही नव्हती. आयशी कामाला जायची. फाटी विकायची. गवताच्या दिवसात गवत. नव्या पावसकाळ्यात भारंगीची भाजी, करटुलं, कुड्याची फुल. रानं सुकली की मग कुड्याची पाळ, गुळवेल, मुरुडशेंगा, वाकेरीच मूळ, असं कायबाय तिचं सुरू असायचं. सारखी पैपैका घरी आणीत असायची. बाची भगतगिरी. आयशीचा वाणसौदा. असं मजेत चालायचं. एकटा नाग्या. बहीणभाव नाही. तेव्हा त्याला देवलसीपण करायला अन ढोल बडवायला हवा तितका वेळ मिळायचा. एकमार्गी मुलगा. त्यात देवचार पाहायचा छंद जडलेला. आयशी निर्धास्त असायची. शेजारणी माय-मावशीला म्हणायची,

" माजा नाग्या मुनावानी सगलं! हिकडं तिकडं पाहायचा नाय!"

असं•ते मुग्वी घर बा गेल्याबरोबर एकदम बसल्यागत झालं. घरात येत असलेला पाणलोटच खंडला.

आयशीनं फास्यांची मोळी बांधली. उदासवाणा नाग्या हात उशाखाली घेऊन भुईवरच पडला होता. दुमडल्या पायावर आडवा पाय टाकून. आयशी कंदरावून म्हणाली,

" असाच निगूर राहाशील? तुला खायला काय घालू?"

गडबडून नाग्या उठून आयशीकडं गोंधळून पाहात म्हणाला,

" काय करू?"

" फास्यांची मोळी घिऊन जातो इकाया?"

मान खाली घालून नाग्या गप्प राहिला. ती आग्रहानं म्हणाली,

" बोलत का नही?"

नाग्या पुटपुटला,

" मला जमायाचा नही!"

" मंग काय जमल् तुला? फाटी आननाही जमायाचा नही?"

तटदिशी उभा राहून नाग्या म्हणाला,

" आनीतो!"

दोन्ही हात कंबरेवर ठेवून आयशी म्हणाली,

" मी म्हनीत्ये, बाजारात जाना का बा तुला जमायाचा नही? कवर मीच जाऊ फाटी घिऊन? बरा, मुळ्यापाळ्या गोळ्या करून ठिवल्या, त्या घिऊन बसशील बाजारात?"

मान हलवीत तोड चिमणीएवढं करून नाग्यानं म्हटलं,

" नही!"

" कसा लोधा माज्या नशिबी आला! बरा, तर जा, फाटीं घेऊन ये. प्याज पिऊन जा."

" आल्यावर पिईन."

" कुठून आनशील फाटीं ? "

" लिंगूबावरून ! "

" तितं कुठली फाटीं र ? अवघी तोडली मोळियांनीं. "

" देवासंबूर हिरडीचा झाड सुकला हाये— "

" आर समदा नही सुकला ! "

" उगावतीकडल्या फाद्या— "

" पर त्याच्यावर चढूं नोको ! "

" का बा ? "

" वर आगिया माशीनं पोळा केला. "

" मला व्हावत नही माशी ! "

" आर येडा ! आईक ! "

" देवीमाशीच्या पाया पडन्. महाग्रेवाच्या पाया पडन्. पोळ्याला ढका लावायचा नही. "

" नही बाबा, नही ! पाया पडण्यानं काही होत नही ! तू आईक ! "

नाग्याच्या मनी असं, की तेवढाच पुन्हा एकदा देव निरखता येईल. त्यानं आयशीच म्हणणं कानाआड केलं. आढ्याची कोयती काढून करगोट्याला अडकवली, अन् तो ढांगा टाकीत निघाला. आयशी ओरडली,

" आर, प्याज पे ! "

" आल्यावर पीन. झाकून ठीव ! "

लवण उतरून तो भराभरा लिंगोबाची धम चढू लागला. वाटेत आइनाच्या झाडावर कोभाळ्याचा वेल चढला होता. त्याचे दोर खाली लोंबत होते. जणू झाडावर कुणी झोपाळाच टांगला होता. नाग्यानं त्याचा एक कोवळा कांडका काढला. दोन वावा लांबीचा. फाटी बांधण्यासाठी.

मग तो तरातरा नाकाड चढून लिंगोबाच्या बुधल्याच्या पोटाशी पोचला. पलीकडे गेल्यावर ऊन्ह तोंडावर आलं. तापू लागलं. पण उलटा सुलटा वाराही वाहात होता. पलीकडल्या सोंडेवर जाऊन तिथून नाग्या बुधल्याचं रूपडं न्याहाळू लागला.

त्याचा महादेव जागच्या जाग्यावर होता. तशीच ती शेंडी. तसंच ते उंच कपाळ. डोळ्याच्या खोबणी. दरदरीत नाकाड. खालचे ओठ. भुवया. सगळं

जिथल्या तिथं. वाऱ्याची झुळूक वर कोसळली, की गवत हल्त होतं. महादेवाचं रूप सजीव भासत होतं. जणू त्यान डोंळे मिटले आहेत. ध्यानासाठी. थोड्या वेळान तो ते उघडील स्नेहाळ मुद्रेनं पाहील. नाग्याकडे. जगाकडे.

नेटकं त्या बुधल्यावर ऊन्ह उतरत होत. त्यामुळं ते महादेवाच मुख तेजानं नुसतं झळाळत होतं. पिवळ्या दरदरीत उन्हात त्याच्या गळ्यातला पोळ्यांचा भुरका हार अधिक उठून दिसत होता. मधली प्रचण्ड मोहोळं ही जणू त्या हारातली चन्द्रपदकं. पाऊणशेऐंशी हात उंचीवरली ती रूपाची माडणी पाहून नाग्या अगदी मोहून गेला. मधल्या त्या मोहोळाकडे हात जोडून तो बोलला,

" देवीमाशी, त्या राती मला दिसली होती का ! "

मग त्यान खाली डोक टेकल. महादेवाला वारवार नमस्कार केला. म्हणाला काहीच नाही. दहानीस वेळ टकल भुईवर टेकल्यावर तो माघारा वळला, अन हिरडीच्या झाडाकडे चालू लागला.

झाडाखाली पोचला, अन पाहिलन, तर खरच. माग तो आला होता, तेव्हा नुसत्या आग्यामाश्या घोघावून गेल्या. पुढ त्यानी मधेच एका फादीवर पकडी बांधली होती. आता चागल दोन हात लाब अन् हातभर उंच पोळ उभारल होतं. उगवतीकडली फादी वाळली होती. बहुधा या पोळ्यामुळच ठाकरानी त्या फादीला आतापर्यंत हात लावलेला नसावा. एरवी ती ठाकराच्या कोयतीच्या तडाख्यातून सुटायची नाही. कुठ वाळक लाकूड दिसल रे दिसल की त्यावर ठाकराच्या कोयतीचे घाव वाजलेच ! महिन्याभरात नाग्या या झाडाकडे फिरकला नव्हता, म्हणून एवढ मोठ पोळ झाल्याच त्याच्या ध्यानी आलं नाही, इतकंच.

त्यालं लगोटी नीट सरशी केली. शेंडीची गाठ पक्की बाधली. मग कोयती खाली ठेवून तो झाडाच्या पाया पडला. म्हणाला,

" झाडदेवा, कोरडाकोरडा तोडीन. वल्याला हात लावनार नही. तुजा आप्राद करनार नही ! "

असं झाडाच पुंजन झाल, मग त्यान पुन्हा एकदा बुधल्याकडे वळून डोकं टेकलं. म्हणाला,

" देवी माश्ये, तुजी परजा हिरडीवर घर करून हितं ऱ्हायली. तिला साग. मला चावू नोको. तिला तरास काई दियाचा नहीं. निसता कोरडी फाटी

तोडीन!"

असं सगळ्याना शपथेत बांधून झाल्यावर कोयती फळाटण्यात अडकावून नाग्यानं झाडाच्या बुंधाभवती हाताची कव घातली. तो वर चढत असता कोयती झाडावर आपटे, खण्णदिशी आवाज होई. पहिल्या बेचक्यात पोचून त्यानं वरचा अंदाज घेतला.

पाचसात हात उंचावर दक्षिणेकडे एक फादी फुटली होती. तिच्या शेंड्या-जवळ पोळं होतं. नाग्यानं त्याच्याकडे निरखून पाहिलंन. ते सगळं माश्यांनी भरलं होतं. त्या पोळ्यावर बसल्या होत्या. एकीवर एक चढत होत्या. पुन्हा खालची वर निघत होती, अन् ती पोळ्याच्या छिद्रामधे तोंड खुपशीत होती. दुसरी कुठली तरी उठून तिच्यावर बसत होती. चार दोन माश्या पोळ्याभवती घोघावत होत्या. काही उठत होत्या. घिरटी घालीत होत्या. पुन्हा माश्याच्या घोळक्यात शिरत होत्या.

नाग्या फारच चमत्कारला. त्यान आग्यांच पोळं इतकं जवळून आतापर्यंत पाहिल नव्हतं. तो तिथल्या तिथं झाडाला लपकून छाती घाशीत आणखी थोडा पुढं सरला. डोळे बारीक करून तो पोळं निरखू लागला.

त्याचं आश्चर्य फारच वाढल. क्वचित एखादं छिद्र मोकळं होत होतं. नाग्याला दिसत होतं. त्याच तोंड सहा कोनाच. प्रत्येक कोन अगदी सारखा. मोजलेला. मापलेला. हरेक छिद्र नेमकं एवढंच. कस हे? कोण शिकवतं यांना? कोण माप मोजून देतं! एखादं छिद्र पाच कोनाच का नसतं? लहानमोठं कसं नसतं? प्रत्येक अगदी सारखं कस!

माश्या उठत होत्या. पुन्हा बसत होत्या. मग काही उडून कुणीकडे तरी जात होत्या. बहुधा त्या मध आणायला जात असल्या पाहिजेत. कुठून आणतात या मध? फुलामधून? मग आपल्याला तो का गावत नाही? आपणच असं एखादं पोळं का बांधू नये? त्यात मध का साठवू नये?

पण आपण मध गोळा करायचा, म्हणजे आपल्याला फुलावर बसता आलं पाहिजे. त्यात तोंड खुपसता आलं पाहिजे. सोंडेनं मध उचलता आला पाहिजे. आपल्याला सोंड कुठं आहे! आपलं तर नाकच शिरेल फुलात. मग त्यातला शेंबूड मधात मिसळेल. छा:! हे काही बरं नव्हे!

आपण फुलावर बसायचं तर फूल तेवढं मोठं पाहिजे, अन् आपल्याला पंख

पाहिजेत. सध्या या दोन्ही गोष्टी जुळायच्या नाहीत. तेव्हा तूर्त हे राहू द्यावं. माश्यानाच मध गोळा करू द्यावा. पण मग त्या तर त्यांच्यासाठी मध गोळा करतात. राम्या सक्या गोइंद्या नाग्यासाठी नाही. तर मग आपण त्यांना का हुसकून लावतो ? त्यांचा कष्टाचा मध का चोरून आणतो ?

बराच वेळ असा घोटाळ्यात पडून नाग्या उभा राहिला. इतक्यात एका माशी उडत त्याच्या नाकापाशी आली. नाग्या म्हणाला,

" आयली ! चावती का काय ? "

पण एकदोन घिरट्या घालून ती उडून गेली. आयशीच्या मनी पक्कं आलं की आपण देवीमाशीला पाया पडून बोललो आहोत. म्हणूनच बहुधा ही न चावता उडून गेली असावी.

उशीर होत चालला. देव माथ्यावर यायला लागला. चटचटायला लागला, मग नाग्यानं माश्याचा नाद सोडला. उगवतीकडल्या वेचक्यात हात घातला. अन् हुप्या वानरासारखा भराभरा तो वाळल्या फांदीकडे चढू लागला. काही क्षणातच तो त्या फांदीवर जाऊन उभा राहिला.

पानं अन् शेंडे कधीचे गळून गेले होते. नुसतं काळसर भुरकं खोड तेवढं उरलं होतं. नाग्याच्या मनी आलं, की नुसतीच अंगभारान ही फांदी मोडली तर पाहावी. त्यान तिच्यावर उभं राहून वरच्या बुंध्याला धरीत चारदोनदा झोके देऊन बघितलं. पण ती काही अजिबात कुजली नव्हती. अंगभारानं तुटेना. तेव्हा मग बुंध्यावर रेलून उभा राहात त्यानं फलाटण्याची कोयती काढून हाती घेतली.

एकदा त्यानं अंगठ्यावर धार चालवून पाहिली. मग उजव्या हातावर थुंकून कोयतीच्या मुठीभवती बोटं घट्ट बसवली, अन् घाव घालायला सुरुवात केली.

त्यानं विचार केला, की सगळीच फांदी खांडून काढू. खाली पडल्यावर कांडकी करू. वेलीनं बांधून घरी नेऊ. सगळी एकदम जायची नाहीत. दोन खेपा करू. तीन करू.

चारदोन घाव घातल्यावर त्याच्या ध्यानी आलं, की लाकूड काही अजिबात कुजकं नाही. पापुद्रा तेवढा पोकळ आहे. आत अजून चिकण गाठच आहे. उगीच आडसोट घावांनी भागायचं नाही. नेमके दो बाजूंनी तिरके घाव घातले पाहिजेत. मग त्यानं खालच्या फांदीवर उभं राहून पक्के घाव घालायला



सुरुवात केली. एकदा या अंगानं. एकदा त्या अंगानं. लाकूड हिरडीचं. प्रत्येक .াव खण्ण खण्ण वाजू लागला. धिलप्या चहू अंगांना उडू लागल्या.

पटकन त्याचं ध्यान पोळ्याकडे गेलं. त्याला वाटलं की माश्या अस्वस्थ .ाल्या आहेत. उठून पोळ्याभोती घोघावू लागल्या आहेत. पण पोळं असलेल्या :डाचीच फांदी तुटत्येय, तेवढ्या अस्वस्थ होणारच त्या. मात्र लवकर उरकलं पाहिजे. त्या फार घाबऱ्या होण्याच्या आत फांदी तुटली पाहिजे. म्हणून तो प्रत्येक घाव पुऱ्या ताकतीनं घालू लागला. धिलप्या फार लांब उडू लागल्या.

फांदी एकदा काडकाड बोलली. आता थोडं राहिलं. चार दहा घावात काम संपणार. नाग्यान निथळणारा घाम एकदा लंगुटीला पुसून काढला, अन् खच्चून घाव घातला. धिलपी उंच उडाली, अन् पोळ्याजवळून पलीकडे जाऊन पडली.

माशा एकदम उडाल्या. उंच घोघावू लागल्या. पण पुन्हा त्या पोळ्यावर उतरल्या. घोघावा कमी झाला. नाग्याला वाटलं, सकट निवारलं. देवीमाशीनं आपलं ऐकलं. भराभरा घाव घालावेत. फांदी तोडावी, की दूर पळावं.

त्यान पुन्हा कोयती उचलली, अन् आता तो घाव घालणार, तो त्याला वाटल, की जस काही चहू दिशांनी अंधारून आलं आहे. भवताली वादळ सोसाटतंय. त्याच्या हातून कोयती गळून पडली. त्यानं तोड दोन्ही हातांनी झाकून घेतलं. तो मनगटावर भाजल्यागत चटका बसला. एक. दुसरा. तिसरा.

असह दाह होऊ लागला. जणू कुणी विषाच्या गरम गरम सुयाच अंगात खुपसतंय. ते तर तसं कपाळावरही भासू लागलं. उघड्या अंगावर. पोटावर. पाठीवर. छातीवर.

नाग्याला सहन होईना. तो आक्रंदू लागला, अन् तोल जाऊन खाली कोसळला. त्या फांदीवरून खालच्या बेचक्यात. तिथून खाली भुईवर. तो उलथा पडला. हात झाडू लागला. तो त्याला वाटलं, की तोड फुटून निघतंय. ते झाकण्यापुरतेही हात तेथवर नेववत नाहीत. त्यान डोळे घट्ट मिटून घेतले.

अचानक एक विषारी गरम सुई त्याच्या डाव्या पापणीतून आत शिरली. डोळ्यात जसा आगीचा लोळ पेटला. नाग्या ठणाठणा बोंबलू लागला. मोठ-मोठ्यानं रडू लागला. रडता रडता म्हणू लागला,

" देवीमाशी, तुज्या पाया पडलो हुतो, नमस्कार केला हुता! परवानकी

घ्येतली हुनी ! तरी त्वा माझं अंग फोडलं ! ह्ये बरं नही ! देवीमाशी, हे बरं नही !"

डावा डोळा कामातून गेला.

त्याच्या बाहुलीतच आग्यामाशीचा डास झाला. तेव्हा डोळ्याचं प्रकरण निकालात निघालं. बाकी अंगभर माग्यांनी जे डासे काढले होते, ते पंधरवडाभर पुरले.

नाग्या घरी कसा आला, हे त्याचं त्याला माहीत. आयशी फाटी घेऊन गेली होती. बापये कुणी वाडीत नव्हते. बायापोरांनी त्याला झडपडत आलेलं पाहिलं. हाक बोंब झाली. मग कुणीकुणी आलं. झाडपाला आणला. वाटला. अंगभर थापला. निजवून ठेवलं. संध्याकाळी आयशी आली. तिनं नाग्याला पाहून आपलं तोंड फोडून घेतल.

पहिले आठ दिवस तो राती दिहा माशावानी तळमळे. पुढं आग शमली. तरी डासे होते, तिथं गांधी उठल्या. त्या पिकल्या. फुटल्या. असा आठवडा पुरता गेला.

आयशी घरी बसून काय करणार ? खाणार काय ? आठवडा झाला, तशी ती म्हणाली,

"बाला, आज फाटी घेऊन जाऊ ?"

"जा."

"उशीर करनार नही !"

"बरा !"

आयशी गेली. भुत्या नि चारदोन जण चौकशी करून गेले. शेजारणी आल्या. रोजच्यासारखं डोळ्यातून पाणी काढून त्याही उठल्या. पोरं झोपडीत घुसली. आरडा करायला लागली. नाग्या म्हणाला,

"रे आरडू नका. सुकानी पडू द्या."

मग तीही बाहेर पळाली. बारा वाटा झाली. उरला एकटा नाग्या. कधी तो पालथा होई. त्या बाजूचे वण दुखू लागले, की मग उलथा.

पण शरीरापेक्षा अधिक दुखे त्याचं मन. तो म्हणे कसं झालं हे ? आपण महादेवाला नमस्कार केला होता. झाडदेवाचं काही ठेवलं नव्हतं. देवीमाशीच्या तर चारसहा वेळा पाया पडलो होतो. तिला सांगितलं होतं. बजावलं होतं. का देवीमाशी, पाया पडलो आहे. कान धरले आहेत. तुझ्या परजेला हुकूम दे. डंख करू देऊ नकोस. डासे काढू देऊ नकोस. अन् मग माश्या काय म्हणून चावल्या ?

आपण काही त्याच्या पोळ्याला धक्का लावला नव्हता. नुमती पलीकडली फाडी तोडीत होतो. एक झिलपी काही पोळ्याला लागली नाही. मग त्यांनी दावा का धरला आपल्याशी ? डोळा का फोडला ?

नाग्यानं ठणकत असलेल्या डोळ्यावर एकदा बोटांनी चाचपलं. अहह ! फार फार दुखत होतं. तिथं अंधारानं भरलेला काळामिट्ट खड्डा होता. यापरतं काहीच शिल्लक नव्हतं. उरलं होतं दुखणं.

माश्याची काय बिशाद ! देवीमाशीचा सांगावा असल्याबिगर कुणाला डासा काढायची त्यांची काय छाती ? त्या नुसत्या सांगितल्या कामाच्या. बानं म्हटलं होतं, की सगळ्या राहाळावर देवीमाशीची सत्ता चालते. ती करील ते होतं. अवघी पोळी तिच्या सागीनं बसतात. तिच्या सांगीन उठतात. उठाव होतात, तेही तिच्या हुकमानं. बा खोटं कशाला सांगेल ? अन् नाग्याशी खोटं बोलेल तो ? ह्याः !

तर मग हा अन्याय देवीमाशीनं केला आहे. तिनं खोड काढली आहे. विनाकारणी नाग्याला दुखवलं आहे. तेव्हा तिला हे उमगलं पाहिजे. नाग्या लहान आहे. उलीसा आहे. देवीमाशी चांदीसोन्याची. राहाळभर तिची सत्ता.

असेना का ! तिनं नाग्याला दुखवलं आहे. कुण्या कारणाविना. नाग्या पाया पडला होता तरी देखील ! ठीक आहे, देवीमाशी, बनली तुझी नाग्याची ! त्वा त्याला दुखवलंस. तो तुला उठवून लावील ! तुलाही कळलं पाहिजे, की नाग्या कुणी आहे !

असं नाग्याचं मन दडावलं. भरून आलं. तेव्हा तो तट्टदिशी उठून बसला. हळूहळू ढुंगणावर घामत झोपडीच्या दाराशी गेला. डोंगूर दिसू लागला. एकाच डोळ्यानं. त्यान डुई खाली टेकली. महादेवाला म्हणाला,

“ देवा, तू बसलेला हायेस. तुझ्या देखत माझ्या नाग्याला डसल्या. आता

नाग्या देवीमाशीवर पेटला. तो तुटेल तरी. जिंकेल तरी. तू बघशीलच."
मग तो पुन्हा खुरडत येऊन अंथरीवर झोपला. त्याला फार बरं वाटलं.

साजावलं. नाग्याला डुलका लागला होता. एकदम तो जागा झाला.
"कोन ?"
"मी! कसा आहेस बाला ?"
एकदा नाग्याला वाटल, आयशीला आपला दावा सागावा. पण तिन अडवलं तर ? म्हणून तो नुसतं म्हणाला,
"बरा !"
आयशी नाग्याजवळ बसली. अंगावरून हात फिरवीत ती म्हणाली,
"दुख कमी झाला ?"
"कमी झाला."
"कशी र माज्या बालाची दशा झाली !"
आयशीन पुन्हा दोन हुंदके दिले. नाग्यान कूस बदलीत म्हटल,
"हुनार तो हुनार ! मागं बी. फुडं बी !"
आयशीला काही उमगल नाही. डोळे पुशीत ती म्हणाली,
"बाला, पानी नही घरात. जाऊ का रे ?"
"जा."
"तुज्यासाठी दाने आनले. मग दीन."
आयशीन मातीची घागर उचलली. कोंबड्यानी घरभर घाण केली होती. एकदा त्याचा उद्धार करीत ती पुसून काढली, अन् ती झऱ्यावर निघाली. नाग्या डोळ्यावर घोगडी घेऊन पडून राहिला.
पुन्हा पाच दहा मिनिटानी पावल वाजली. नाग्यान सजग होऊन म्हटलं,
"कोन ?"
पावलं जवळ येत म्हणाली,
"मी !"
त्या स्वरात दुःख होतं. वेदना होती. आणखीही काही होतं. नाग्यानं

तोंडावरची घोंगडी काढली. बघितलं, तर त्याच्या पायांवर हात ठेवीत कुणी बाईमाणूस बसलंय. तोंड गुडघ्यात खुपसून हुंदके देत.

" कोन ? " नाग्यानं आश्चर्यानं विचारलं.

चिंधीनं डोळे पुशीत म्हटलं,

" मी ! चिंधी. "

" चिंधी ? "

" त्या येली दुसऱ्याची होती. आता कुनाची नाही. "

नाग्यानं निरखताच एकदम त्याला आठवलं. खंतावून तो म्हणाला,

" चिंधी, बग, त्या माश्यांनी कसा फोडला मना तो ! "

वारंवार वाहते डोळे पुशीत चिंधी बोलली,

" कसा र येडाविद्रा रूप केला माज्या राजाचा ! बगू कुटं कुटं डासा काढला तो ! "

चिंधी त्याच्या अंगावरले वण बघू लागली. छातीवर. पाठीवर. पायांवर. मांड्यांवर. त्यावरून हात फिरवू लागली. तिचा श्वास वणांवर कोसळू लागला. शेवटी तिनं त्याचं डोकं हातात धरून डोळा पाहिला. एकदम हुंदका फुटून तिनं त्याचं डोकं छातीशी आवळून धरीत म्हटलं,

" माजा नाना ढोलिया ! "

वण दुखत होते. नाग्यानं धडपडत डोकं सोडवलं. म्हणाला,

" दुखतां गो ! पर चिंधी, मी बदला घेनार ! "

" घे ! "

" देवमाशीला उठवून लावनार ! "

" लाव रे नाग्या ! "

" बानी सांगतला, का कुनाच्या वाटी जाऊ नको. कुनी वाटी गेला, तर त्याला डंखल्याबिगर ऱ्हाऊ नको ! "

" खरा रे खरा ! "

तो आयशी घागर घेऊन परतली. म्हणाली,

" कोन ? "

चिंधीनं म्हटलं,

" मी – चिंधी. "

आयशीनं ओळखलंन्. आठया उठून म्हणाली,

" चिंधी ? उंडगी ? नवऱ्यापाशी नांदत नही ? उठवळ ! कशाला आली ?"

चिंधीनं शब्द न बोलता मान खाली घातली. तिचं बकूट धरून आयशी म्हणाली,

" ऊठ ! आली कशाला ? "

या वेळी मात्र शान्तपणं चिंधी बोलली,

" मी माज्या ढोलियाच्या घरात शिरली ! "

आयशी थक्क झाली. चिंधीचं बकूट सोडून तिच्यासमोर उभी राहिली. दोन्ही हात कमरेवर ठेवून उंच स्वरात म्हणाली,

" निलाजरी ! धींगडी ! तुला ग्वाल्ला तरसानी ! अगे, माजा बाला तुज्यापरीस नाना. त मोठी. चल भाएर हो ! होती का नहीं ? "

चिंधी थोडी हादरली. मागं कुडाशी सरली. मात्र कुडाचा आसरा मिळताच तिनं ठरवलं. उठायचं नाही. वाटेल ते झालं तरी. तिथंच मुटका घालून ती बसून राहिली. हे पाहून आयशीनं कोपऱ्यातला झाडू उचलला. उगारीत म्हणाली,

" निंगनी का नही ? न्हवरा सोडून पळून आली भिंगरी—उष्टी—"

आता मात्र खवळून चिधी तिथल्या तिथं डोळे काढून म्हणाली,

" सासबाये गं, त्या मेमश्याचा नाव काढू नोको ! ढोरावानी खपली. पैका परत धिला मेल्याचा. काडी मोडून घ्येतली—"

" आता माज्या बालाला गिलाया आली ? "

" माजी पिरीत हाये त्याच्यावर. "

" खपलीस ती ! मसनी ! चाल, हो भाएर ! "

चिंधी जागेवरून हलण्याचं चिन्ह दिसेना. अंधारू लागलं होतं, तरी तेवढ्या प्रकाशात आयशीला चिंधीचा उंच दांडगा देह दिसला. हिला मारू गेल्ये, तर हीच उठून भिंतीत चेपायची. तेव्हा मग आयशीचा उगारला हात खाली आला. तोंड मात्र दुप्पट जोरानं सुरू झालं. ती नाना परीचं बोलली. बराच वेळपर्यंत बोलत राहिली. नाग्या तोंडावर पांघरूण घेऊन झोपून राहिला. चिंधी तंबाखूची गुळणी तोंडात असल्यासारखी बसून राहिली. गूमसूम.

आयशीचा कडाका ऐकून शेजारीण आली. दाराबाहेरून तिनं विचारलं,

" काय गे झाला ? "

" माजा मसनीचा भोग ! दुसरा काय ? "

तेवढ्यात शेजारणीच्या कुत्र्यानं कोंबडीचं पिलू तोंडात धरून आणलं. ओरडा झाला, म्हणून ती तिकडे धावली. आयशीही दाराबाहेर डोकावली. तिचं तोंड बंद झालं. थोडा वेळ तिथंच थाबून मग ती चुलीत घालण्यासाठी विस्तू आणण्यासाठी गोवरी घेऊन बाहेर पडली. पलीकडल्या झोपडीतल्या राधीच्या चुलीतून तिनं चार निखारे गोवरीवर घेतले, अन् मग तिथंच पाय पसरून बसली. राधीला म्हणाली,

" आता गो काय करू ? "

" झाला तरी काय ? "

" अगे चिंधी घरात घुसली माज्या ल्येकाच्या ! "

आयशीकडून सगळं ऐकून घेऊन राधी म्हणाली,

" तुजा काय नासला ? "

" का ? "

" फाटी घेऊन पेठेत जाईल. गवत कापील. काम करील. एक हात मोडला, तर दुसरा उगावला ! "

हे आयशीच्या ध्यानीच आलं नव्हतं. ती डोक्यावर हात देऊन तशीच तिथं बसून राहिली. तवर गोवरी जळून सुद्धा गेली.

नाग्या डुईवर घोंगडी घेऊन पडून राहिला होता. कुत्र्यानं कोंबडीचं पिलू पळविल्याचं त्यानं ऐकलं. शेजारीण त्याच्यामागं धावल्याचं त्यान ऐकलं. तिच्यामागोमाग आयशी गेल्याचही त्यान ऐकलं. चिंधी कुडाजवळ बसून असल्याचं त्याला जाणवलं. पण त्यान घोंगडीतून तोंड बाहेर काढलं नाही. पहिल्याक्षणी तो चिंधीजवळ बोलला खरं, पण मग त्याला लाज वाटली.

असा थोडा वेळ गेला. नाग्या इथं. चिंधी तिथं. बाहेर कुत्री भुंकत राहिली. बायांचा आरडा.

तो पुन्हा भुंगे घुमल्याचा आवाज आला. माश्यांचा उठाव !

तटकन नाग्या घोंगडी फेकून उठला. मंत्र घातल्यासारखा तो बाहेर धावला. खरोखरीच माश्यांचा उठाव! त्या अंधाऱ्या रात्री माश्या रांगेजून गोंगाट करीत चालल्या होत्या. रात्री तर त्या आपल्या पोळ्यात बसून असतात. या अशा भलत्या वेळी का बा कातावून चालल्या? बहुधा कुठं कुणी ठाकरानं मधासाठी त्याना पोळ्यामधून हुसकून काढलं असावं.

लंगडत नाग्या उठावामागं पळू लागला. खलाटीत उतरला, तो त्याला हाक आली.

"ए येड्या! तुजा अंग दुखतो ना? मंग पळतो कुठं?"

चिंधी त्याच्या मागोमाग धावत होती.

तिनं दुखणाऱ्या अंगाची आठवण देताक्षणी त्याच्या सगळ्या जखमा कळा देऊ लागल्या. तो अवघडत उभा राहिला. तिनं जवळ येऊन त्याला धरलं. खलाटीतल्या चोंढ्याच्या बांधावर त्याला नेऊन अलगद बसवलं. मग त्याच्या भवती हाताचा अलगद विळखा घालीत ती म्हणाली,

"कुठं पळत होता?"

नाग्याच्या स्वरावाटे वेदना पाझरली.

"माश्या! मला फोडला त्या!"

"त्याच्या मागा कशाला धावत होता?"

गोंधळून नाग्यानं म्हटलं,

"मला ठावा नही!"

"अहाहा! कसा र येडा माजा ढोलिया!"

नाग्यानं श्वास भरून घेऊन एक कण्ह टाकला. त्याचं तोंड समोर धरीत चिंधीनं पुसलं,

"लई दुखतं?"

"हा!"

"बांधावर नको बसं."

"मग?"

"इकडं ये!"

लहान लेकरासारखं चिंधीनं नाग्याला धरून बळंबळं आपल्या कुशीत घेतलं. आपल्या हातानं त्याचं सगळं अंग झाकून तिनं त्याच्या कपाळावर आपले

ओठ टेकले. नाग्यानं पुन्हा एक श्वास टाकला. लाबच्या लाब. चिंधीनं बिचारलं,

" आता बरा वाटतो ? "

" हूं ! "

ती त्याला वेटाळून बसून राहिली. काही क्षणानंतर नाग्या जोर करून उठला. त्याचा बाहुटा धरत ती म्हणाली,

" का र नान्या भगता ? "

" त्वा मगाशी आयशीला सांगल– "

" काय ? "

" तू न्हवऱ्याजवळ नादत नहीं – "

एकदम चिधीला रड्ड फुटल. कधी फुटल नाही ते आता फुटल. त्या पंचवीस रुपयांसाठी तिन काय काय कष्ट केले. ऊन्ह पाहिल नाही. तहान पाहिली नाही. मणामणाचे भारे घेऊन लपालपा वाकत आठ आठ दहा दहा मैल धावली. लांडग्यासारखे वखवखलेले अधाशी तिच्या लगट्र आले. डोळ्याच्या जरबेन तिनं त्याना दूर ठेवल. कडुस पडेतोवर रान धुडाळून मुळ्याफुल गोळा केली. बाजारात ती कवडी मोलाला विकली. हेत एक. पचवीस रुपये गोळा करायचे होते. नवऱ्याच्या बंधनातून सुटायच होत. तो अपात्र होता. बुळा होता. कमलीच कळा त्याच्या अंगी नव्हती. नुसत ते शेणाच बाहुल होतं. या विजेला मोह पडावा अस त्याच्या अंगी काहीच नव्हत.

बधनातून सुटायची एवढी घाई कशासाठी ? तर तिच्या मनी बसलेला भगत तिला दुसऱ्याची बाईल म्हणाला होता तो पुण्यवन्त होणार होता. त्याला हे अस दुसऱ्यान वापरलेले धडुत चालणार नव्हत. म्हणून तिन कष्टाच्या परटवणीत ते धुतल. खंगाळून काढल. स्वच्छ केल. अन आता लख्ख मोकळी होऊन ती सजणाकडे आली. इतर कुणी आपल्या नवऱ्याविषयी बोल लावला असता, तर तिनं त्याचे कान भाजतील, अस उत्तर दिल असतं. पण तिच्या ढोलियानंही तेच म्हणाव ? अरे येड्या, लग्न नुसत नावाला झाल होत. पहिल्या भेटीतच त्या मेमशाच पाणी किती खोल ते कळल होत. म्हणून तर चिंधी त्याच्याजवळ नादत नव्हती. तेवढ्या त्या डागानं चिंधी बाटली ? तेवढा डाग तर आकाशातल्या चादव्यालाही असतो !

पण मग एखाद्या शहाण्या मुलीसारखं तिन रड्ड पुसून टाकलं. म्हणाल,

" माजा कुंनी न्हवरा नही. मोकली हाये मी. "

आग्रहानं नाग्यानं पुसलं,

" त्या पारीला मंगलसूत होता तुज्या गल्यांत तो ? "

त्याच्या जवळ येऊन चिंधीनं त्याचा हात धरला. आपल्या गळ्याभोवती फिरवला. म्हणाली,

" हाये मोकला ! "

अवघडून नाग्यानं म्हटलं,

" हा हा ! "

" खुल्या, आता मी कुनाची नही. काडी मोडून घिली त्या न्हवऱ्यानं. गाडगंभर पैका मढ्यावर वतताबरुबर ! "

तिचं अंग तिटकाऱ्यानं शहारून आलं. त्या प्रसंगाची सय होताच एकदा ती तोंड भरून थुंकली. म्हणाली,

" मुडदा ! "

नाग्यानं खुळ्यासारखं विचारलं,

" कोन ? "

तिला खुदकन हसू आलं. म्हणाली,

" कुनी नही. "

पण नाग्या पाऊलभर मागं सरून म्हणाला,

" तुला माजा काय उपेग नही ! "

" का रे ? "

" माजा नी देवीमाशीचा भांडन पडला. "

का ते सगळं सांगून झालं. तो सांगत राहिला. त्याचं ते साधं भोळं सरळ बोलणं चिंधी ऐकत राहिली. ते थेट तिच्या मनाला भिडलं. त्यात काहीच खोटं नव्हतं. लटकं नव्हतं. नाहत्या उमळत्या झऱ्यासारखं ते वाहाणं होतं. शेवटी तो म्हणाला,

" ती देवीमाशी. सगल्या राहाळाची रानी. मी ठाकरवाडीचा नाग्या. उलीसा मानूस. पर भांडन पडला तो पडला. आता मांगं सरायचा नही. कवातरी मी देवीमाशीला तिथून हाकलनार ! मी तिच्या पाया पडला. तरी तिनं माजा डोला का फोडला ? "

डोळ्याचं दुःख आटवताच नाग्याचे वण पुन्हा ठणकू लागले. डोळा पुन्हा दुखू लागला. तो बसायसाठी आसरा शोधू लागला. पटकन चिंधी उठली. तिनं याला धरलं. नेसत्या चिरडीचा एक पदर फेडला. तो खाली अंथरला. त्याच्या-वर त्याला बसवलं. मग भरभरून येऊन ती त्याला पुसू लागली,

" येड्या, देवीमाशीचा पोळा डोंगुराच्या कड्याला—"

" नही —"

" मंग ? "

" म्हादेवाच्या गल्यात. "

" हा, गल्यांत. पर तो तीन त्रिसा हात उंच. तू तो कसा काडशील ? कसा झाकलशील ? "

उत्तर सुचलं नाही. नाग्या अवघडून म्हणाला,

" कसाबी ! "

" येकलाच ? "

" हा, येकलाच. "

" आर, हा जिवावरचा काम ! "

" ठावा हाय. "

" तरी येड्या तू करनार ? "

" हा हा ! "

झरदिशी चिंधीच्या डोळ्यात पाणी आलं. तिनं ते बोटांनी पुसून काढलं. उसासून म्हणाली,

" बरा बाबा ! केला पायजे ! "

आश्चर्यानं नाग्यानं विचारलं,

" उसासायला काय झाला ? "

त्या वेळी चिंधीनं पुन्हा एकादा त्याला अलगद कवेत घेतलं. त्याच्या छातीत तोंड लपवून ती बसून राहिली. तो अवघडून म्हणाला,

" का बा धरून ठेवला मला ? "

फुदुफुदु हसून चिंधी म्हणाली,

" मग कुनाला धरू ? खांबाला ? "

हेही बरोबरच आहे. खांबाच्या छातीत काही डोकं लपवता यायचं नाही